


संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा




रजि नं. ११४३९–५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, शुक्रवार दि. ०३.०५.२०२४ | अंक नं. ०५२ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020




# नगर अर्बन बँक ठेवीदारांच्या उपोषणाला पोलिसांचा 'मज्जाव'

**आंदोलन स्थळावरील मंडप केला जप्त, भर उन्हात बसून ठेवीदारांकडून धिक्काराच्या घोषणा**

नगर – नगर अर्बन बँक घोटाळ्यातील आरोपी संचालक–अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करून त्यांच्या मालमत्ता जप्त कराव्यात तसेच ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत मिळण्यासाठी पोलिस प्रशासनावर दबाव वाढविण्याच्या दृष्टीने बँकेच्या ठेवीदारांनी ३ मे रोजी एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण पुकारले होते. तथापी या आंदोलनासाठी पोलिस अधीक्षक कार्यालयासमोर उभारण्यात आलेला मंडप भिंगार कॅम्प पोलिसांनी शुक्रवारी (दि. ३) सकाळी जप्त करत ठेवीदारांना उपोषणास बसण्यास परवानगी नाकारली आहे. त्यामुळे हाताश झालेल्या ठेवीदारांना निवेदन देण्यासाठी तीन तासाहून अधिक काळ भर उन्हात पोलिस अधीक्षक कार्यालयासमोर ताटकळत उभे रहावे लागले.

नगर अर्बन बँकेतील आर्थिक घोटाळ्यातील दोषी संचालक, अधिकारी, थकबाकीदार कर्जदारांवर कारवाई करावी, आणि ठेवीदारांच्या ठेवी परत मिळण्यासाठी पोलिस प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी यासाठी बँक बचाव संघर्ष समितीने पोलिस अधीक्षकांना यापुर्वीच निवेदन देत ३ मे रोजी सनदशीर मार्गाने एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण करण्यात येणार असल्याचे सुचित केले होते. त्यानुसार अनेक ठेवीदार शुक्रवारी (दि. ३) सकाळी पोलिस अधीक्षक कार्यालयासमोर जमा झाले. जिल्हा आणि जिल्ह्याबाहेरूनही अनेक ठेवीदार या ठिकाणी आले. परंतु आंदोलनासाठी उभारण्यात आलेला मंडप भिंगार कॅम्प पोलिसांच्या पथकाने सकाळीच जप्त केला. सध्या निवडणूक आचारसंहिता लागू आहे. तुम्ही आंदोलनासाठी रितसर परवानगी घेतलेली नाही ५ पेक्षा जास्त व्यक्तिंना एकत्र येण्यास मनाई आहे. अशी कारणे देत ठेवीदारांना उपोषणास बसण्यास पोलिसांनी मज्जाव केला. आता आंदोलनास परवानगी नाकारली असली तरी आमचे निवेदन स्विकारा अशी मागणी करत ठेवीदार तीन तासाहून अधिक काळ पोलिस अधीक्षक कार्यालयासमोर ताटकळत राहिले. ७ मे रोजी बँकेच्या खटल्यासंदर्भात न्यायालयात सुनावणी आहे. त्यावेळी सर्व ठेवीदार न्यायालयात हजर राहून न्याय मागणार असल्याचे बँक बचाव समितीचे राजेंद्र गांधी यांनी सांगितले. दोषी संचालक, अधिकारी यांच्यावर कठोर कारवाई करून त्यांच्या मालमत्ता जप्त कराव्यात, फरार आरोपींना तात्काळ अटक करावी, बँकेसंदर्भात दाखल सर्व गुन्ह्यांमध्ये एमपीआयडी कलम ३, ४ व ५ तसेच कटकारस्थानचे कलम वाढविण्यात यावे, फॉरेन्सिक ऑडिटरची चौकशी करून जाणीवपूर्वक वगळलेल्या आरोपींची नावे वाढविण्यात यावीत, आरोपींच्या मालमत्ता विक्रीची प्रक्रिया जलदगतीने राबवावी, ठेवीदारांच्या ठेवी परत कराव्यात, फरार आरोपींची नावे जाहीर करावीत यासह विविध मागण्यात करण्यात आल्या आहेत. या आंदोलनावेळी पोलिसांच्या कारवाई विरोधात ठेवीदारांनी घोषणाबाजी करत धिक्कार केला.

या आंदोलनात समितीचे डी. एम. कुलकर्णी, राजेंद्र चोपडा, राजेंद्र गांधी, राजेंद्र सबलोक, आसाराम भागवत, दिलीप सोनार, सौ. वैशाली सोनार, विलास कूलकर्णी, अवधूत कुकडवाल, नंदकूमार भालेराव, सौ. सारिका पेठकर, अनिता भालेराव, भानुदास दाणे, बाबासाहेब दळवी, उषा दळवी, सुमन जाधव, अभिजित दळवी, पद्मा जोशी, सविता भंडारी, विठ्ठल पोटे, नारायण क्षिरसागर, शकूंतला लोहकरे, अशोक सुर्यवंशी, ताराबाई काकड, कृष्णनाथ वैकर, मोहिनीराज महाजन, मीरा देहडराय, एस आर बनकर यांच्यासह अनेक ठेवीदार सहभागी झाले होते. *(छायाचित्र पान २ वर)*

## पोलिसांनी परवानगी नाकारणे खेदजनकच : राजेंद्र चोपडा

नगर अर्बन बँकेचा घोटाळा देशभर गाजत आहे. गोरगरीबांच्या ठेवी बँकेत अडकल्या आहेत. आजारपण, दैनंदिन गरजा भागविण्यासाठी ठेवीदारांकडे पैसे नाहीत. न्याय मागण्यासाठी उपोषन केले जाणार होते. मात्र पोलिसांनी परवानगी नाकारली. आतापर्यंत अनेक राजकीय पक्ष, नेत्यांची आंदोलने झाली. पण अशा प्रकारची कारवाई झाली नाही. आता मात्र मंडप जप्त करण्यात आला ही खेदजनक बाब आहे. पोलिसांनी आरोपी संचालक व थकबाकीदार कर्जदार यांना पकडावे. त्यांच्यावर कायद्यानुसार कारवाई करावी अशी मागणी करतानाच बँकेच्या या घोटाळ्याकडे कोणत्याही पुढाऱ्याचे लक्ष नाही याचा खेद वाटतो, असे बँकेच सभासद राजेंद्र चोपडा यांनी म्हटले आहे.

## प्रकाश आंबेडकर यांची नगरमध्ये ४ मे रोजी निवडणूक प्रचार सभा



नगर – वंचित बहुजन आघाडी व ओबीसी बहुजन पार्टी चे अधिकृत उमेदवार दिलीप कोंडीबा खेडकर यांच्या प्रचारार्थ राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांचे मार्गदर्शनाखाली ४ मे रोजी सकाळी ११ वा. एन आर लॉन आणि मंगल कार्यालय, नगर औरंगाबाद रोड, अहमदनगर येथे जाहीर सभा आयोजित केली आहे.

या सभेस प्रमुख उपस्थितीत राज्य उपाध्यक्ष प्रा. किसन चव्हाण, राज्य उपाध्यक्ष दिशा पिंकी शेख, राज्य समन्वयक ॲड. अरुण जाधव, एकलव्य संघटनेचे अध्यक्ष अनिल जाधव सह अहमदनगर जिल्हा, तालुका, गाव शाखा विविध संघटनेचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहे अशी माहिती जिल्हा महासचिव योगेश साठे यांनी दिली.

आदिवासी, भटके, अल्पसंख्यांक, ओबीसी, एसी, एसटी समाजातील जनतेने सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष प्रतीक बारसे, शहराध्यक्ष हनीफ शेख, भिंगार शहराध्यक्ष जे. डी.शिरसाठ, नगर तालुकाध्यक्ष मारुती पाटोळे यांनी केले.

# सावेडी उपनगरात महिलेच्या गळ्यातील दागिने पळविले

**नगर शहर परिसरात चेन स्नॅचिंगच्या घटना थांबता थांबेनात**

नगर – नगर शहर परिसरात गेल्या महिनाभरापासून चेन स्नॅचिंग करणाऱ्या चोरट्यांनी चांगलाच धुमाकूळ घातला आहे. मार्केट यार्ड, तारकपूर, केडगाव बायपास, सिव्हिल हडको, भिस्तभाग रोडवरील वृंदावन कॉलनी परिसरात घडलेल्या घटना ताज्या असताना गुरुवारी (दि.२) सायंकाळी सावेडी उपनगरातील नवलेनगर येथे रस्त्याने पायी चाललेल्या महिलेच्या गळ्यातील दागिने विना क्रमांकाच्या मोटारसायकलवर आलेल्या दोघा चोरट्यांनी हिसका मारून तोडून नेले आहेत.

याबाबत कांता सुभाष पुरी (रा. नवले नगर, सावेडी) यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी पुरी या गुरुवारी (दि.२) सायंकाळच्या सुमारास नवले नगर परिसरात रस्त्याने पायी घराकडे जात होत्या. त्या सदाफुले यांच्या घरासमोर आल्या असता त्यांच्या पाठीमागून विना क्रमांकाच्या मोटारसायकलवर दोन जण आले. त्यातील पाठीमागे बसलेल्या इसमाने पुरी यांना धक्का मारून खाली पाडले, त्यानंतर त्याच्या गळ्यातील सोन्याची चेन हिसका मारून तोडून तातडीने मोटारसायकल वर बसून भरधाव वेगात तेथून दोघेही पसार झाले.

चोरट्याने दिलेल्या धक्क्याने रस्त्यावर पडलेल्या फिर्यादी यांना सावरे पर्यंत चोरटे तेथून गायब झाले होते. नंतर फिर्यादी पुरी यांनी आरडा ओरडा केला मात्र नागरिक जमा होवूनही उपयोग झाला नाही. याबाबत पुरी यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात जावून फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी दोघा अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध भा.दं. वि.कलम ३९४, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## पोलिसांना चोरटे का सापडेनात

दरम्यान नगर शहर परिसरात गेल्या महिनाभरापासून चेन स्नॅचिंगच्या घटना वारंवार घडत आहेत. रस्त्याने चाललेल्या महिलांच्या गळ्यातील दागिने हे चोरटे हिसका मारून तोडून नेत आहेत. विशेषतः तोफखाना पोलिस स्टेशन हद्दीत असलेल्या उपनगरी भागात हे प्रमाण जास्त आहे. या भागात गेल्या काही दिवसात अनेक चेन स्नॅचिंगचे प्रकार तर सकाळी ८ ते ८.३० च्या दरम्यान घडले आहे.

मध्यंतरी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एक चोरटा पकडला होता, मात्र तरीही या घटना थांबलेल्या नाहीत त्यामुळे अशा प्रकारे चोऱ्या करणारे अनेक चोरटे सक्रीय असल्याचे स्पष्ट होत आहे. तोफखाना तसेच कोतवाली पोलिसांना मात्र हे चोरटे सापडत नाहीत. सध्या निवडणुकीमुळे सर्वत्र नाकाबंदी केली जात असताना हे चोरटे विना क्रमांकाच्या मोटारसायकल वर बिनधास्त फिरतातच कसे असा प्रश्न उपस्थित होत आहे.






















जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## भीती वाटूनही ती न दाखवणं म्हणजे धाडस

खरी मोठी माणसं प्रचंड तपस्वी, मेहनती. सातत्यपूर्ण व धारीचे असतात हे खरंच.

जागतिक स्तरावरील उत्तुंग व्यक्तिमत्त्व स्व. नेल्सन मंडेला कृष्णवर्णियांच्या अधिकारांसाठी लढणारे नेते म्हणून आपल्याला माहीत आहेच. त्यांच्या समयसूचकता व धाडसाचे एक उदाहरण आहे. मंडेला यांच्या आत्मचरित्राच्या लेखनात मदत करणारे रिचर्ड स्टेन्घेन दोघे एका छोट्या विमानातून प्रवास करीत होते. चारच माणसं असणाऱ्या त्या विमानात मंडेला वर्तमानपत्र वाचण्यात दंग होते. रिचर्ड त्यांच्या समोरच बसले होते. अचानक दोघांचेही लक्ष बाहेर गेले आणि त्यांच्या लक्षात आले की विमानाचा पंखा फिरतच नाहीय. रिचर्डचा चेहरा पांढरा पडला.






मंडेला शांतपणे म्हणाले, ''रिचर्ड, पायलटला हे सांगायला हवं.'' आणि पुन्हा ते वाचत बसले.

सुदैवाने विमान सुखरूप उतरलं तेव्हाही मंडेला शांत होते. नंतर सुरळीत झाल्यावर मंडेला रिचर्डला म्हणाले, ''मी काय घाबरलो होतो!'' रिचर्डस् पाहातच राहिला. पण इतक्या आणीबाणीच्या वेळी त्यांनी धीड असल्याचं दाखवून मंडेलांनी वेगळेपणा दाखवला. धाडस किंवा खंबीरपणा म्हणजे न घाबरणं नव्हे. भीती वाटूनही ती न दाखवणं हे धाडस असतं. मंडेलांनी आयुष्यभर हेच करून कृष्णवर्णियांचं जीवन सुधारलं.

## निवडणुकीदरम्यान 'डीप फेक' सारख्या गैरप्रकारांवर कारवाईचे शासनाचे आदेश

मुंबई - लोकसभा निवडणुकीदरम्यान डीप फेक व्हिडिओज, क्लिप्स, फोटो किंवा इतर प्रकारचा कंटेंट तयार करून तो समाजमाध्यमे / डिजिटल माध्यमांवरून प्रसारित करण्यात येत आहे. या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी संबंधितांवर कडक कारवाई शासनामार्फत करण्यात येणार आहे. यासंदर्भात पोलीस महासंचालकांना सूचना देण्यात आल्या आहेत.

फोटोशॉप, मशीन लर्निंग (एमएल) किंवा आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) यांसारख्या विविध तंत्रांचा गैरवापर करून डीप फेक व्हिडिओज, क्लिप्स, फोटो किंवा इतर प्रकारचा कंटेंट तयार करण्यात येतो. निवडणुकीदरम्यान या तंत्राचा गैरवापर हा चिंतेचा विषय आहे. एखादा उमेदवार, राजकीय पक्ष किंवा निवडणुकीच्या मुद्द्याविषयी चुकीचे व्हिडिओ, ऑडिओ, फोटो तयार करण्यात येतात किंवा खऱ्या फोटो, ऑडिओ, व्हिडिओमध्ये फेरफार करून ते चुकीच्या पद्धतीने प्रसारित करण्यात येतात. असे गैरपद्धतीने तयार केलेले डीप फेक व्हिडिओज, क्लिप्स किंवा फोटो खरे असल्यासारखे भासतात आणि त्यामुळे संबंधिताविषयी गैरसमज किंवा बदनामी होते. निवडणूक काळात अशा प्रकरणांमध्ये वाढ होत असून यावर आळा घालण्यासाठी तसेच स्वच्छ आणि पारदर्शक निवडणूक प्रक्रिया होण्याच्या दृष्टीने 'डीप फेक' कंटेंट तयार करणाऱ्या आणि प्रसारित करणाऱ्या समाजकंटकांवर कायद्यानुसार कडक कारवाई करण्यात यावी, अशा सूचना शासनाने दिल्या आहेत. राज्य शासनामार्फत पोलीस महासंचालकांना यासंदर्भात सूचना देण्यात आल्या असून पोलीस खात्यामार्फत यासंदर्भात कार्यवाही करण्यात येणार आहे. निवडणूक आयोगानेही विपर्यस्त माहिती रोखण्यासंदर्भात त्यांच्या मार्गदर्शिकेमध्ये सूचना दिल्या आहेत.




**सावेडी उपनगरात भटक्या डुक्करांचा उपद्रव** नगर शहरात मोकाट कुत्रे, जनावरे यांचा प्रश्न ज्वलंत असतानाच आता उपनगराच्या प्रभाग क्र.१, २, ४ मधील गावडे मळा, तवलेनगर, कोहिनूर परिसरात भटक्या डुक्करांचा उपद्रव वाढला आहे या बरोबरच शहरातील काही अन्य भागांतही डुकरांचा त्रास नागरिकांना होतो. या भागातील डुक्कर(वराह) पालन करणाऱ्या व्यावसायिकांचे शहराबाहेर पुर्नवसन करण्याची गरज आहे. रस्त्यावरील कचरा आवाराचा वेळेवर उठाव होत नसल्याने डुकरे त्याठिकाणी ठाण मांडून राहतात. तरी पालिकेच्या पशुवैद्यकीय विभागामार्फत शहरातील उपद्रवकारक भटकी, मोकाट डूक्करे यांना अटकाव करणे व त्यांची शहराबाहेर व्यवस्था लावण्याची मोहीम राबवावी अशी मागणी होत आहे. (छाया - महावीर पोखरणा)

# राजकीय दबावापोटी सरपंचाला अरेरावीची भाषा करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करा

### आर्थिक तडजोड न केल्याने चार्जशीट थांबून जिल्हा बंदी करण्याचा हट्ट; महाविकास आघाडीने घेतली पोलीस अधीक्षकांची भेट

नगर - सध्या नगर दक्षिण मतदार संघात महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांवर राजकीय दबावापोटी खोटे गुन्हे दाखल करून त्यांच्यावर जोर जबरदस्तीच्या उद्देशाने पोलीस कायदा हातात घेत असल्याचे दिसून येत आहे. ३० एप्रिल रोजी सकाळी ११:३० वाजता चिचोंडी पाटील ग्रामपंचायत कार्यालयात नगर तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रल्हाद गीते हे पोलिसांचा फौज फाटा घेऊन आले व ग्रामपंचायत कार्यालयात घुसून चिचोंडी पाटीलचे सरपंच शरद खंडेराव पवार यांना धमकावून विचारणा केली की तू गावामध्ये कसा काय आला? बाहेर चल, लगेच गाडीत बस, नाटक करू नको तू आमच्या गोष्टी मिटवलेल्या नाही आम्हाला वरून प्रेशर आले आहे, असे बोलत शिवीगाळ केली.



राजकीय दबावापोटी सरपंचाला अरेरावेची भाषा करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर करावी, या मागणीचे निवेदन महाविकास आघाडीच्यावतीने पोलिस अधीक्षकांना देण्यात आले.

याबाबत सरपंच शरद पवार यांनी त्यांना सांगितले की तीन महिन्यापूर्वी माझ्यावर दाखल असलेल्या गुन्ह्यात जामीन मंजूर आहे. त्यामध्ये मला गावाच्या विकासात्मक धोरणामध्ये ग्रामपंचायत मीटिंग पाणीपुरवठा व महत्त्वाच्या मीटिंगमध्ये गावामध्ये येण्यास परवानगी आहे. त्यामुळे आज गावात आलो आहे. याबाबत २९ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता नगर तालुका पोलीस स्टेशनचे ठाणे अंमलदार यांच्याकडे रीतसर पत्रव्यवहार करून सरपंच गावात जाणार असल्याची कल्पना दिलेली होती. तरी देखील सदर गुन्ह्यातील चार्जशीट दाखल होईपर्यंत मला गाव बंदी आहे. सदर गुन्ह्याला गुन्हा घडवून ३ महिने उलटून गेले तरी देखिल पोलिसांनी चार्जशीट दाखल केलेली नाही व याबाबत विचारणा केली तर तू आमची पैशाची मागणी पूर्ण केलेली नाही त्यामुळे मी तुझे चार्जशीट दाखल करणार नाही असे म्हणत तुला गाव बंदी केली आहे. यानंतर जिल्हा बंदी करणार त्यामुळे आमचं मिटून घे असे काही दिवसापूर्वी सांगितलेले होते. सदर सरपंचाने पोलीस निरीक्षकांची मागणी पूर्ण न केल्याने ग्रामपंचायतच्या मासिक मीटिंग मधून बाहेर काढले व गावकऱ्यासमोर बदनामी होईल अशा पद्धतीने अवाच्य भाषेत शिवीगाळ केली. या निषेधार्थ महाविकास आघाडीच्या वतीने पोलीस अधीक्षकांची भेट घेवून या प्रकरणाची चौकशी करून कारवाई करण्याच्या मागणीसाठी निवेदन देण्यात आले.

यावेळी काँग्रेस नेते घनश्याम शेलार, शिवसेना जिल्हाप्रमुख शशिकांत गाडे, राष्ट्रवादी उपाध्यक्ष किसनराव लोटके, राष्ट्रवादी युवक शहराध्यक्ष प्रकाश पोटे, सरपंच शरद पवार, माजी सभापती प्रवीण कोकाटे, चंदू पवार, भारत बोडखे, अरुण म्हस्के, बाबासाहेब सय्यद, दीपक झोडगे आदिसह पदाधिकारी उपस्थित होते.

## शॉक बसून तरूणाचा मृत्यू

नगर - विहीरीतील विज पंप दुरूस्तीचे काम करत असताना शॉक लागून तरूणाचा मृत्यू झाल्याची घटना नगर तालुक्यातील साकत गावच्या शिवारात घडली. विकास दत्तात्रय वाघमोडे (वय ३०, रा. साकत ता. नगर) असे मयत तरूणाचे नाव आहे. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. विकास वाघमोडे हे बुधवारी (दि. १) सायंकाळी विहिरीतील विज मोटार दुरूस्तीचे काम करत असताना त्यांना विजेचा शॉक लागला. त्यांना तात्कळ उपचारासाठी त्यांचे नातेवाईक सोमनाथ राजाराम चितळकर यांनी येथील जिल्हा शासकीय रूग्णालयात दाखल केले. दरम्यान तेथील डॉक्टरांनी त्यांना उपचारापूर्वीच मृत घोषित केले. याबाबतची खबर नगर तालुका पोलिसांना देण्यात आली असून पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पोलीस अंमलदार आर. व्ही. गांगुर्डे तपास करीत आहेत.

## भालचंद्र पाठक यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - बुरुडगाव रोड वरील वैभव हॉटेल जवळील प्रभात कॉलनीत राहणारे भालचंद्र शंकरराव पाठक (वय ८५) यांचे वृद्धापकाळाने ३० एप्रिल रोजी निधन झाले

त्यांच्या मागे १ मुलगा, २ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## सोनाबाई कुमावत (मोरवाळ) यांचे वृद्धापकाळाने निधन

श्रीरामपूर - येथील सोनाबाई गोपीचंद कुमावत (मोरवाळ) (वय ८५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे.



बांधकाम व्यवसायिक बालाजी कुमावत व हरिभाऊ कुमावत यांच्या मातोश्री, माजी नगरसेवक लक्ष्मण मोहनराव कुमावत यांच्या चुलती होत.

## नंदलाल तलरेजा यांचे अल्पशः आजाराने दुःखद निधन

श्रीरामपूर - येथील नंदलाल मोटूमल तलरेजा (वय ६५) यांचे अल्पशः आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, तीन भाऊ, एक मुलगा, तीन मुली, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. जयराम, चंदरलाल व ताराचंद तलरेजा यांचे थोरले बंधू, प्रेम तलरेजा यांचे वडील, आनंद, घनशाम, दिनेश, चेतन, पियुष व हर्ष तलरेजा यांचे चुलते होत



## सौ.सुवर्णा घोरपडे यांचे हृदयविकाराने दुःखद निधन

श्रीरामपूर - येथील सौ.सुवर्णा रोहिदास घोरपडे (वय ५५) यांचे हृदयविकाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.



नेवासा रोड येथील गायत्री बांबू मर्चंटचे मालक रोहिदास बाळाजी घोरपडे यांच्या पत्नी, युवराज व निलेश घोरपडे यांच्या मातोश्री होत

## उद्योजक लक्ष्मण कोद्रे यांचे अल्प आजाराने निधन

आळंदी - येथील कोद्रे मंडप स्पीकर्सचे मालक उद्योजक लक्ष्मण हनुमंत कोद्रे ( वय ८० वर्षे ) यांचे अल्पशा आजाराने ( बुधवारी ) निधन झाले. त्यांचे मागे पत्नी, तीन मुले, एक मुलगी, एक भाऊ, सुना, नातवंडे, पुतणे असा परिवार आहे.



आळंदी नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्षा वर्षा पंडित कोद्रे यांचे सासरे व युवा उद्योजक पंडित कोद्रे, गणेश कोद्रे, कमलेश कोद्रे यांचे ते वडील होत. त्यांचे पार्थिवावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.



उपोषण करण्यास पोलिसांनी मज्ञाव केल्यानंतर त्यांच्याविरोधात पोलिस अधीक्षक कार्यालयासमोर घोषणाबाजी करताना नगर अर्बन बँकेचे ठेवीदार. (छाया - बबलू शेख)

# महिलेविरुद्ध बेकायदेशीर सावकारीचा गुन्हा दाखल

नगर - नगर मधील एका महिलेवर बेकायदेशीर सावकारीचा व्यवहार केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदाराने केलेल्या तक्रारीची नगर तालुका उपनिबंधक कार्यालयात केलेल्या तक्रारीची चौकशी केल्यानंतर सहकार अधिकारी श्रेणी -२ अल्ताप शेख (रा. आलमगीर, भिंगार) यांनी याबाबत कोतवाली पोलिस ठाण्यात गुरुवारी (दि.२) सायंकाळी फिर्याद दिली आहे.

शहरातील नालेगाव भागातील एक महिला बेकायदेशीर सावकारी करत असल्याची तक्रार एका तक्रारदाराने नगर तालुका उपनिबंधक कार्यालयात केली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने या कार्यालयातील सहकार अधिकारी श्रेणी -२ अल्ताप शेख यांनी चौकशी केली. या चौकशीत सदर महिलेने केलेले व्यवहार हे सावकारीतून केल्याचे समोर आले. त्यामुळे अल्ताफ शेख यांनी उपनिबंधक कार्यालयाच्या परवानगीने कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून या फिर्यादी वरून पोलिसांनी सदर महिलेविरुद्ध महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ चे कलम ३९ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# एस.टी. बस प्रवासादरम्यान महिलेचे चार लाख रुपयांचे दागिने चोरीला

### नगरच्या माळीवाडा बसस्थानक ते शेवगाव दरम्यान घडली घटना

नगर - एस.टी. बस प्रवासा दरम्यान अनेक महिलांचे दागिने चोरीला गेलेले असताना आणखी एक अशीच घटना समोर आली आहे. नगरहून शेवगाव कडे जाण्यासाठी माळीवाडा बसस्थानकातून एस टी बस मध्ये बसलेल्या केडगाव मधील महिलेचे पर्स मध्ये ठेवलेले सुमारे ४ लाख ४ हजार रुपये किमतीचे ५ तोळे ६ ग्रॅम वजनाचे दागिने अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना गुरुवारी (दि.२) सकाळी ९.३० ते ११ वाजेच्या दरम्यान घडली आहे.

याबाबत स्मिता कल्याण पागिरे (रा. रेणुका नगर, केडगाव, मूळ रा. आंतरवाली, ता. शेवगाव) यांनी गुरुवारी सायंकाळी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी पागिरे या नगरहून खंडोबानगर, शेवगाव येथे जाण्यासाठी सकाळी माळीवाडा बस स्थानकात आल्या होत्या. त्या नगर शेवगाव बस मध्ये बसल्या होत्या. त्यांनी त्यांच्या जवळील मोठ्या पर्स मध्ये एका लाल रंगाची छोटी पर्स ठेवली होती. त्यात सुमारे ४ लाख ४ हजार रुपये किमतीचे ५ तोळे ६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठन, कानातील टॉप, वेल असे दागिने ठेवलेले होते.

बस प्रवासा दरम्यान अज्ञात चोरट्याने त्यांची नजर चुकवून पर्स मधील दागिने ठेवलेली छोटी पर्स चोरली. शेवगावमध्ये गेल्यावर ही चोरीची घटना त्यांच्या लक्षात आली त्यानंतर त्यांनी सायंकाळी पुन्हा नगर मध्ये येत कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत.

दरम्यान सध्या लग्न सराई सुरु असल्याने बाहेरगावी जाण्यासाठी महिला वर्ग एस टी बसला जास्त पसंती देत आहे. बस प्रवासात महिलांना ५० टक्के सवलत शासनाने लागू केलेली असल्याने महिलांची नेहमीच एस टी बस प्रवासासाठी गर्दी होताना दिसत आहे. याच गर्दीचा फायदा घेत महिलांचे दागिने चोरणारे चोरटे सध्या मोठ्या प्रमाणावर सक्रीय झालेले आहेत.

शहरासह जिल्ह्यात बस स्थानकावर तसेच बस प्रवासादरम्यान महिलांचे दागिने चोरीला जाण्याचे प्रमाण वाढलेले आहे. या चोरट्यांनी पोलिसांसमोर एकप्रकारे आव्हानच उभे केलेले आहे. त्यामुळे बस प्रवासात महिलांनी दागिने सांभाळण्याची गरज आहे.

# विश्वस्तांच्या खोटया सह्या करत बँकेत केले कर्ज प्रकरण; नगरमधील दोघा डॉक्टरांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल

नगर - बँकेतील ८ कोटी ५० लाखांच्या कर्जप्रकरणाला संस्थेला जामीनदार करण्यास विश्वस्थांचा विरोध असतानाही विश्वस्थांच्या खोटया सह्या करत आणि खोटी कागदपत्रे तयार करून बँकेत कर्जप्रकरण केल्या प्रकरणी नगरमधील दोघा डॉक्टरांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अमित रसिकलाल कोठारी (रा. माणिकनगर, अहमदनगर) यांनी गुरुवारी (दि.२) रात्री कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. डॉ. राकेश कांतीलाल गांधी (रा. महादेव अपार्टमेंट, पाईपलाईन रोड), डॉ. आशिष अजित भंडारी ( रा.सारसनगर, अहमदनगर) असे गुन्हा झालेल्या दोघांची नावे आहेत. फिर्यादी कोठारी व आरोपी हे रेंज फौंडेशन सोसायटी तथा ट्रस्ट या सेवा भावी संस्थेचे आणि बाबाजी हरजी कर्पे पाटील प्रतिष्ठान या दोन्ही संस्थांचे विश्वस्त आहेत. यातील डॉ. राकेश गांधी हे रेंज फौंडेशन सोसायटी तथा ट्रस्ट चे स्थापनेपासून अध्यक्ष आहेत.

त्यांनी व डॉ. भंडारी यांनी बाबाजी हरजी कर्पे पाटील प्रतिष्ठान तर्फे छत्रपती संभाजी नगर रोडवरील तवले नगर येथे चालविण्यात येत असलेल्या साई एंजल्स स्कुल च्या इमारतीच्या वरील मजल्यावरी खोल्यांचे बांधकाम करण्यासाठी एचडीएफसी बँकेच्या स्टेशनरोड शाखेत ८ कोटी ५० लाखांचे कर्जप्रकरण करण्याचे ठरविले त्यासाठी रेंज फौंडेशन सोसायटी तथा ट्रस्ट या संस्थेला जामीनदार करू असे सांगितले. त्यास विश्वस्त असलेले फिर्यादी अमित कोठारी, श्वेता अमित कोठारी व रसिकलाल रसिकलाल चंदुलाल कोठारी (मयत) अशांनी विरोध दर्शविला. त्यानंतरही विरोध करणाऱ्या विश्वास्थांच्या खोटया सह्या करून खोटी कागदपत्रे तयार करून डॉ. गांधी व डॉ. भंडारी यांनी कर्ज प्रकरण केले.

हा प्रकार दि. ९ फेब्रुवारी २०२३ ते दि.१३ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत घडला.आम्ही सह्या केलेल्या नसतानाही संस्थेला सुमारे ८ कोटी ५० लाखांच्या कर्ज प्रकरणात जमीनदार करून डॉ. गांधी व डॉ. भंडारी यांनी आमचा विश्वासघात करून फसवणूक केली असल्याचे अमित कोठारी यांनी फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी डॉ. गांधी व डॉ. भंडारी यांच्या विरुद्ध भा.दं.वि. कलम ४०६, ४६७, ४६८, ४७१, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## भरदुपारी बाजार पेठेतून अल्पवयीन मुलीचे अपहरण

नगर - शहरातील बाजार पेठ परिसरात असलेल्या तेलीखुंट येथून भर दुपारी १६ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अज्ञात व्यक्तीने अपहरण केल्याची घटना गुरुवारी (दि.२) दुपारी १२.३० ते २ वाजेच्या दरम्यान घडली आहे.

याबाबत त्या पिडीत मुलीच्या आईने रात्री तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीची अल्पवयीन मुलगी ही गुरुवारी दुपारी घरी असताना अज्ञात व्यक्तीने तिला कशाची तरी फुस लावून पळवून नेले. दुपारी फिर्यादी यांना त्यांची मुलगी घरात दिसून न आल्याने त्यांनी तिचा आजूबाजूला तसेच नातेवाईकांकडे, तिच्या मैत्रिणींकडे शोध घेतला. सायंकाळ पर्यंत शोध घेवूनही ती सापडली नाही, त्यामुळे अखेर रात्री त्यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात जावून फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात व्यक्ती विरुद्ध भा.दं. वि. कलम ३६३ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## मंगल कार्यालयासमोरून मोटारसायकलची चोरी

नगर - नगर-कल्याण रोडवर नेप्ती (ता.नगर) गावच्या शिवारात असलेल्या अमरज्योत लॉन या मंगल कार्यालयाच्या पार्किंग मध्ये लावलेली हिरो कंपनीची स्प्लेंडर मोटारसायकल (क्र. एम.एच.१६ बी एन ९५२९)अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ३० एप्रिल रोजी सकाळी ११.३० ते दुपारी २.३० या कालावधीत घडली आहे.

याबाबत आप्पा भानुदास घुगे (रा. भगवान बाबा चौक, सारसनगर) यांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याच्या विरुद्ध भा.दं.वि.कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### द्राक्षे आहे नॅचरल टॉनिक

द्राक्षे हे मलावरोधावर उत्तम औषध आहे. तसेच त्यापासून तयार केलेल्या मनुकाही एक चांगले टॉनिक आहे. पचनाच्या सर्व विकारांवर द्राक्षे उपयोगी आहेत. काळ्या मनुकांच्या सेवनाने रक्त वाढते व हिमोग्लोबीनचे प्रमाण वाढते. लहान मुले व विशेषता महिलांनी याचे सेवन केल्यास हिमोग्लोबीनमध्ये लक्षणीय वाढ होते.

## पाककला

### गार्लिक पोटॅटो

**साहित्य –** ४ बटाटे, २ मध्यम आकाराचे कांदे, ७–८ लसूण पाकळ्या, लिंबाचा रस, कोथिंबीर बारीक चिरून, साखर व मीठ आवडीप्रमाणे, ४–५ सुक्या लाल मिरच्या.

**कृती –** बटाटे व कांद्याची साले काढून पातळ लांबट फोडी कराव्यात. लाल मिरच्या, मीठ व लसूण एकत्र वाटून घ्यावे. कढईत पाव वाटी तेल गरम करून फोडणी करावी. फोडणीत वाटण व कांदा परतून घ्यावा. त्यात पाव चमचा हळद घालावी व बटाट्याच्या फोडी घालाव्यात. झाकण ठेवून मंद गॅसवर भाजी शिजू द्यावी. लाल मिरचीमुळे भाजीला सुंदर लाल रंग व स्वादही येतो. भाजी शिजल्यानंतर २ टीस्पून लिंबाचा रस व कोथिंबीर घालावी.

## वास्तू

### शहनगृह

शयनगृहाचे अंतर्गत द्वार उत्तर, पूर्व, ईशान्य अथवा इतर शुभ दिशेत असावे.

* बिछान्याची पलंगाची जागा नैर्ऋत्य भागात असावी.

* शयनगृहास शक्यतो खिडक्या कमीतकमी असाव्यात. मावळत्या सूर्याची किरणे आत येणार नाहीत अशा प्रकारे त्यांची रचना करावी.

* रोज सकाळी ९ ते ११ वाजेच्या दरम्यान अग्नेय दिशेला तुपाचा दिवा लावावा.

## सल्ला

दहीवडे करताना दह्याचा स्वाद वाढविण्यासाठी दही लावतानाच त्यात आल्याचा रस घालावा. म्हणजे त्या दह्याला वेगळाच स्वाद येईल. चाट मसाला वापरूनही दह्याची चव वाढवता येईल.

## सौंदर्य

* दोन चमचे बेसन, घोडीचंदनाची पावडर, व कच्चे दूध एकत्र कालवून वाटल्यास त्यात एक–दोन थेंब लिंबाच्या रसाचे टाका. हा लेप सावळ्या त्वचेला उजळवून टाकतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

# दैनिक पंचांग

**शनिवार, दि. ४ मे २०२४**

वरुथिनी एकादशी, शके १९४६ क्रोधीनाम संवत्सर, चैत्र कृष्णपक्ष, पू.भा.२२।०७

सूर्योदय ०६ वा. २५ मि. सूर्यास्त ०६ वा. २९ मि.

**राशिभविष्य–**

**मेष** : जर आपणास आपले निवासस्थान बदलण्याची इच्छा असेल तर आजचा दिवस उत्तम आहे. हितचिंतकांकडून व्यापारासंबंधी चांगला सल्ला मिळू शकतो.

**वृषभ** : संपत्तीच्या खरेदी–विक्रीसाठीही उत्तम दिवस. आपण आपल्या घरासाठी मोठी खरेदी करू शकता. आर्थिक बाबतीत उन्नती होईल. व्यवसायात उत्तम स्थिती राहील. आरोग्य उत्तम राहील.

**मिथुन** : कार्य योग्य वेळी पूर्ण करण्यासाठी कठोर श्रम करावे लागेल. व्यापाऱ्यांसाठी परिस्थिती साधारण. आपणास गरज असेल तेव्हा कुटुंबियांचे सहकार्य मिळेल. व्यापार–व्यवसायात स्थिती नरम–गरम राहील. प्रवास काळजीपूर्वक करा.

**कर्क** : यथायोग्य विचार करून कार्य करा अडचणी येण्याची शक्यता आहे. शत्रू वर्गापासून दूर राहा. आपल्या आर्थिक मुद्द्यांनुसार एखाद्याचे मन वळविणे कठिण होईल.

**सिंह** : आपली योजना बनवण्यात सावधगिरी बाळगा. जोडीदाराशी वादविवाद टाळा. कार्यातील अडचणी दूर होतील. आरोग्य उत्तम राहील. काहीकाळ कठीण गेल्यानंतर यश मिळेल.

**कन्या** : अधिकाऱ्यांकडून कामे करवू शकाल. अपत्यांचा सहयोग मिळेल. कौटुंबिक वातावरण आनंददायक राहील. वाहने व उपकरणे जपून वापरा. कौटुंबिक विषयांमध्ये वेळ अनुकूल राहील.

**तूळ** : व्यापार–व्यवसायासाठी आज दिवस उत्तम राहील. एखाद्या मित्राचे प्रशंसनीय सहकार्य मिळेल. घराच्या विषयांमध्ये वेळ उत्तम. कार्यात सहकार्यांचा सहयोग मिळेल. सामाजिक कार्यांमध्ये अनुकूल सहयोग मिळेल व सन्मान वाढेल.

**वृश्चिक** : आजचा दिवस आपल्या कार्य–योजनेंसाठी आणि सहकार्यांबरोबर आपल्या संबंधांसाठी विधायक ठरेल. मुलांसाठी आणि पत्नीसाठी जास्त वेळ काढणे आवश्यक आहे. वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील.

**धनु** : अधिक चांगली कामाची स्थिती आणि सामर्थ्य सिद्ध करण्यासाठी चांगली वेळ आहे. ज्यांच्याबरोबर आपणास वेळ घालवणे आवडते त्यांना वेळ द्या. मान–सन्मानात वाढ होईल.

**मकर** : बेपवाई, बेशिस्त, योजनेच्या कार्यवाहीत खोळंबा निर्माण करू शकते. त्यांना ठरावीक वेळेत पूर्ण करण्याचे प्रयत्न करा. अधिकार क्षेत्रात वाढ होईल. आनंदाची बातमी मिळेल. मानसन्मानात वाढ होईल.

**कुंभ** : आपले सार्वजनिक जीवन बहुमूल्य राहील. आपणास एखाद्या योजनेसाठी इतरांचे सहकार्य हवे असेल तर तसे सांगण्यास मागे–पुढे पाहू नका. मित्रांचे सहकार्य मिळेल. सर्जनशील कार्यांमध्ये शिस्त असल्यास उन्नतीचा मार्ग मोकळा होईल.

**मीन** : आपल्या आवश्यकतेप्रमाणे इतर लोक आपल्या मदतीला येतील. इतर योजना आणि उपक्रम नेहमीसारखेच चालू द्या. आपल्याकडे जे काही चांगले विचार आहेत ज्यांना इतरांपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे. धार्मिक भावना वाढेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

## शब्दगंध क्र. ६९१५ सौ. शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ■ | ५ | ६ |
| ७ | | ■ | ८ | | ९ | | |
| | ■ | १० | ■ | ■ | | ■ | |
| ११ | १२ | | १३ | | ■ | १४ | ■ |
| ■ | | ■ | | ■ | १५ | | १६ |
| १७ | | ■ | १८ | | ■ | १९ | |
| | ■ | २० | ■ | ■ | ■ | २१ | |
| २२ | | | | | ■ | ■ | ■ |

**आडवे शब्द :–** १) पुरुषाचे एक आदरार्थी टोपणनाव ५) गुराखी ७) हुंगण्याचा एक पदार्थ; तपकीर ८) अपमान; अवमान; पाणउतारा ११) धनुष्यबाण १५) मळालेला घाणेरडा १७) गाईम्हशीची विष्ठा १८) तीन गुणांपैकी एक; धूळ १९) बगीचा; उद्यान; बाग २१) बंदुकीची दारू २२) पुरुषाचे एक आदरार्थी टोपणनाव

**उभे शब्द :–** १) एक कुविद्या २) एक गोड वनस्पती ३) स्त्रीचे एक नाव ४) दाट झाडी असलेली जागा ५) साखरेची चव ६) ॲटलांटिक महासागर व पॅसिफिक महासागर यांना जोडणारा कालवा ९) तुकडा; अनेक देशांचा समुच्चय १०) चिखल; राड १२) राखण; रक्षा; रखवाली १३) लग्न झालेल्या स्त्रीचे आईवडिलांचे घर १४) गोष्टीतील चाळीस चोरांचा सरदार १६) मोठे गाव; शहर १७) निवडक; चांगला २०) हा प्राणी पाण्याच्या बाहेर जिवंत राहू शकत नाही

**शब्दगंध क्र. ६९१४ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | पा | र | ■ | म | ज | बू | त |
| मा | र | ■ | मा | ठ | ■ | ड | र |
| प | ख | वा | ज | ■ | बी | ■ | का |
| ■ | ■ | व | रा | त | ■ | क | री |
| क | पा | ट | ■ | ■ | सो | पा | ■ |
| बा | व | ळ | ट | ■ | पा | ळ | त |
| व | ■ | ■ | पा | व | न | ■ | ळ |
| ■ | सं | क | ल | न | ■ | हे | वा |

**फिल्मीचक्कर क्र. ११३६ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ब | स | य | ही | अ | प | रा | ध |
| ■ | ली | ■ | ■ | स | ती | ■ | न |
| फू | ल | दो | मा | ली | ■ | शि | वा |
| लॉ | ■ | ब | ■ | न | न्हा | ■ | न |
| का | ■ | द | ■ | क | ■ | ■ | ■ |
| ता | ■ | न | ■ | ली | ना | ■ | आ |
| रों | ■ | प्या | सा | ■ | स्ति | ■ | नं |
| का | ■ | र | ■ | म | क | स | द |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : ज्या लोकांमध्ये आपला जन्म झाला, त्या लोकांचा उद्धार करणे हे आपले कर्तव्य आहे; ही जाणीव ज्यांना आहे ते धन्य होत. **– डॉ. आंबेडकर.**

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### जगात भुते असतात का?

लहानपणापासून तुम्हाला भुताखेतांची भिती दाखवली गेली असेल. अंधार, बागुलबुवा तसेच भुते यांच्याबद्दल कोणत्याही लहान मुलाला भीती वाटतेच ज्ञानाच्या कक्षा विस्तारतात, तसे भीती कमी होत जाते. खरेच का जगात भुते असतात? या प्रश्नाच्या दोन्ही बाजूंनी अत्यंत निर्धारपूर्वक बोलणारे अनेक जण भेटतील देव आहे किंवा नाही पुनर्जन्म आहे किंवा नाही; तसाच हाही एक वादाचा तर कधी वितंडवादाचा मुद्दा होऊ शकतो. माहिती नसलेल्या गोष्टींबद्दल गूढतेचे वलय निर्माण होतेच. त्यामुळेच सर्वांनाच भुतांच्या गोष्टीत कमालीचे स्वारस्य असते. भुते माणसाच्या मनात असतात. असे म्हणतात व ते खरे आहे. माणसाच्या मानसिक दौर्बल्याचा एक आविष्कार म्हणजे भूते होत. भुताचे अस्तित्व शास्त्राने अमान्य केले आहे. भूत हे कोणालाही सिद्ध करता आलेले नाही. भूताने झपाटणे, भूतबाधा आदि गोष्टी हे मनोविकार असल्याचे सिद्ध झाले आहे.

बऱ्याचदा एखाद्या व्यक्तीला भूतबाधा झालेली आहे, असे ठरवून मांत्रिकाकडे तिला नेण्यात येते. तेथे भूत उतरवण्याच्या नावाखाली त्या व्यक्तीचा शारीरिक छळ केला जातो. कधी कधी ती व्यक्ती मृत्युमुखीही पडते. असे होणे हे सुसंस्कृत समाजासाठी एक लांछनच होय. भुतांचे अस्तित्वच नाही ती केवळ एक कल्पना आहे.

### कोल्ह्याचा कांगावा

एका शेतकऱ्याने आपल्या घराजवळील शेतात काकडी लावली होती. काकड्या पिकू लागल्यावर एक मोठा लठ्ठ कोल्हा नित्य नेमाने लपत–छपत काकड्या खाऊन जात असे. एकदा शेतकऱ्याला हे समजताच त्याने कोल्ह्याचा बंदोबस्त करायचे ठरविले. कोल्ह्याला पकडण्यासाठी त्याने जवळच एक सापळा लावून ठेवला. एके दिवशी काकड्यांवर ताव मारून घाईघाईत पळून जात असता कोल्हा नेमका त्या सापळ्यात अडकला.

सापळ्यात कोल्ह्याला अडकलेला पाहताच एक कोंबडा त्याच्याजवळ आला आणि मान वाकडी करून त्याच्याकडे आश्चर्याने पाहू लागला. कोंबड्याला पाहून सापळ्यातून सुटका करून घेण्याची युक्ती कोल्ह्याला सुचली. ढोंगीपणाने कोंबड्याला म्हणाला,

''बघ रे मित्रा संकटात सापडलो? अरे, पहाटे तुझा आवाज ऐकला आणि वाटले, बरेच दिवस झाले तू भेटला नाहीस. तुझी विचारपूस करावी म्हणून येथे आलो आणि असा सापळ्यात अडकलो. हे सर्व तुझ्यावरील प्रेमामुळेच घडलं. तेव्हा आता मला मदत कर. मला एक काठी आणून दे, म्हणजे मला येथून निसटता येईल.''

कोल्ह्याचा कांगावा ऐकून कोंबडा घरी गेला आणि शेतकऱ्याला कोल्हा सापळ्यात अडकल्याचे सांगितले. मग शेतकरी एक मोठा सोटा घेऊन धावतच सापळ्याजवळ आला. कोल्ह्याला चांगला खरपूस चोप दिला. या चोपाने कोल्हा जागीच ठार झाला.

तात्पर्य : खोटेपणा कधी न कधी उघडकीस येतोच येतो.



## जीवन चक्र

परमात्मा की खोज प्रत्येक जीव को है। आत्मानुभव के बारे में भारतवर्ष के इतिहास में लिखा है कि राजाओं ने अपना राज्य वैभव छोड़कर एकांत अपनाया, ताकि उन्हें दुनिया की सबसे मूल्यवान वस्तु, आत्मानुभव प्राप्त हो सके। प्राचीन काल की एक कथा है कि एक बालक जो आठ वर्ष का था, जिसका नाम आरुणी था, धौम्य ऋषि के आश्रम में आया। ऋषि ने उसे सेवा के काम में लगा लिया। तीन माह तक सेवा करने के पश्चात गुरु ने उसे बुलाकर आश्रम की गायें चराने का काम सौंप दिया। जब उसे गायें चराते हुए तीन माह बीत गए, तो गुरु ने उसे बुलाकर पूछा कि वह भोजन कहाँ करता है?

आरुणी ने जवाब दिया कि लंगर में भोजन करता हूँ। गुरु ने कहा कि उसकी सेवा, आश्रम से बाहर की है इसीलिए उसे लंगर में भोजन नहीं करना चाहिए। आरुणी गायों का दूध निकाल कर, उसे पीकर गुज़ारा करने लगा। तीन माह बाद जब गुरु ने पूछा तो आरुणी ने सही–सही जवाब दे दिया। इस पर गुरु ने उसे कहा कि उसे गायों का दूध नहीं पीना चाहिए। आरुणी अब बछड़ों के पीने के पश्चात् गायों के थन पर जो फेन (झाग) रह जाता था, उसे चाट कर समय निकालने लगा। तीन माह बाद फिर गुरु ने उससे कहा कि उसे फेन चाटते देख बछड़े ज़्यादा फेन छोड़ देते हैं और भूखे रह जाते हैं। आरुणी अब जंगल के फल खाकर समय बिताने लगा, तो एक दिन गुरु ने फल भी मना कर दिये। आरुणी जंगल के पत्तों पर गुजारा करने लगा और इस कारण से उसकी आँखों की ज्योति चली गई। किन्तु उसकी अंतर की आँख खुल गई और उसे प्रभु का साक्षात्कार हो गया। फिर गुरु जी ने आकर उसकी आँखें बहाल कर दी। इस प्रकार आरुणी की आत्मा में हार न माननेवाली शक्ति थी, जिसने उसे प्रेम का लक्ष्य प्राप्त करा दिया। इसी को लेकर एक शायर लिखता है :

**मुहब्बत के लिए कुछ खास दिल महसूस होते हैं**
**ये वो नग्मा है जो हर साज़ पर गाया नहीं जाता**
**कायउ देवा काइअउ देवल काइअउ जंगम जाती ॥**
**काइअउ धूप दीप नईबदा काइअउ पूजउ पाती ॥**
**काइआ बहु खंड खोजते नव निधि पाई ॥**
**ना कछु आइबो ना कछु जाइबो राम की दुहाई ॥ रहाउ ॥**
**जो ब्रहमंडे सोई पिंडे जो खोजै सो पावै ॥**
**पीपा प्रणवै परम ततु है सतिगुरू होइ लखावै ॥**

इस शब्द में राजा पीपा जी महाराज शरीर की महानता के बारे में और इस शरीर को जान देनेवाली शक्ति के बारे में बातचीत कर रहे हैं। राजा पीपा राजस्थान में गागरोन गढ़ नामक एक रियासत के राजा थे और प्रभु को पाने की लगन इनमें शुरू से ही बहुत थी। ये बहुत से संत–महात्माओं के पास जाया करते थे, ताकि इन्हें वह अमृत मिल जाए जिसको पाने के बाद हम सब मदहोशी में पहुँच जाते हैं।

बहुत सी कथाएँ इनकी जिंदगी के बारे में मशहूर हैं, जिनमें से एक यह है कि एक बार ये बनारस में संत रविदास जी महाराज के पास पहुंचे क्योंकि इन्होंने उनका बहुत नाम सुना था, ताकि ये प्रभु के रास्ते पर चल सकें, प्रभु के दर्शन अपने अन्दर कर सकें। संत रविदास जी महाराज जूते बनाने का काम करते थे। संत रविदास जी महाराज जिस पानी से जूते बनाने का कार्य कर रहे थे, वही पानी उन्होंने प्रसाद के रूप में राजा पीपा को पीने के लिए दे दिया। राजा होने के कारण राजा पीपा को समझ में नहीं आया कि वे गुरु के प्रसाद को कैसे ठुकराएँ? उस जमाने में बिजली तो होती नहीं थी और अंधेरा काफ़ी था। संत रविदास जी एक झुग्गी में रहा करते थे।

**(कृपाल आश्रम, अहमदनगर)**

## शुद्ध जीवन जीने के मंत्र

'हिन्दू, मुस्लिम, सिक्ख, ईसाई आपस में सब भाई–भाई' यह घोषणा तो सभी लोग करते हैं परन्तु हम आपस में भाई–भाई हैं तो हमारा पिता कौन है, यह भी समझना जरूरी है। हम सबके शरीर का पिता तो अलग–अलग है और हम सब शरीर नहीं परन्तु आत्मा हैं और आत्मा का पिता एक ही है परमपिता परमात्मा। स्वयं परमात्मा ने ही अपना परिचय ब्रह्मा तन के द्वारा बताया है कि वह निराकार ज्योति बिन्दु रूप और प्रकाशमय है।

निराकार ज्योति बिन्दु परमपिता परमात्मा को ही हिन्दू लोग भगवान, ईश्वर, प्रभु कहते हैं और ज्योतिर्लिंग के रूप में उनकी पूजा, आराधना करते हैं। अमरनाथ, विश्वनाथ, सोमनाथ, पशुपतिनाथ (नेपाल) इत्यादि मन्दिरों में शिव परमात्मा के ही स्मरणचिन्ह ज्योतिर्लिंग के रूप में हैं। गोपेश्वर, रामेश्वर के मन्दिरों में भी शिवलिंग की ही पूजा होती है।

'मक्का' के मुख्य तीर्थ स्थान में भी एक बड़ा पाषाण है जिस पर ज्योति का प्रतीक चिन्ह है जिसे सभी बड़े प्यार व आदर से चूमते हैं। इसी को वे 'संग–ए–असवद' कहते हैं, जिसकी स्थापना मोहम्मद ने की, ऐसा मानते हैं।

क्रिश्चियन धर्म के संस्थापक जीसस क्राईस्ट और सिक्ख धर्म के स्थापक गुरुनानक ने भी परमात्मा को निराकार ज्योति के रूप में ही माना है। जापान में बौद्ध धर्म के लोग भी ज्योति के रूप में ही एक छोटा पत्थर सामने रखकर उस पर अपना मन एकाग्र करते हैं।

इससे यह सिद्ध होता है कि परमात्मा, भगवान, अल्लाह, ईश्वर, गॉड ये शब्द अलग हैं परन्तु वो परमात्मा एक ही है और वह निराकार ज्योति बिन्दु रूप है जिसके मन्दिर भारत में और भारत के बाहर भी अनेक देशों में हैं।

सुप्रसिद्ध वैज्ञानिक अल्बर्ट आइन्स्टाईन अपने सापेक्षता के सिद्धांत के आधार पर इस निष्कर्ष पर पहुँचे कि इस सृष्टि में जो भी ऊर्जा है, उस ऊर्जा का स्रोत इस सृष्टि के बाहर एक और ऊर्जा का केन्द्र बिन्दु हो सकता है। उसी ऊर्जा के बिन्दु को उन्होंने भगवान कहा था। परमपिता परमात्मा रूप में बिन्दु तथा गुण और शक्तियों में सिन्धू हैं, वो परमज्योति हैं।

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**


## हसा आणि शतायुषी व्हा!

**बंता : चुकी झाल्यावर माफी मागणाऱ्या माणसाला काय म्हणतात?**
**संता : समजदार**
**बंता : फारच सुंदर आणि चुक नसताना माफी मागणाऱ्याला काय म्हणतात?**
**संता : बॉयफ्रेंड**

## रविंद्रनाथ टागोरांच्या कविता

(मूळ इंग्रजीत)

पृथ्वीच्या व पाण्याच्या गर्भातून
मी प्रेम करतो
मी प्रेम करतो
असे रुदन ऐकू येत आहे



**मूळ इंग्रजी कविता – रविंद्रनाथ टागोर**
**मराठी अनुवाद – अरविंद ब्राम्हणे,**
भिंगार मो. ९४०३७३४२८१

## स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

लग्नानंतर लैंगिक संबंध पवित्र संस्कारातून व प्रेमभावनेतून निर्माण झालेले असतात. केवळ वासनेपोटी झालेले नसतात. मी तिच्या मित्राला आत केबिनमध्ये बोलावून घेतले व त्यालाही रिनाच्या शरीरावर अनैतिक लैंगिक संबंधातून झालेले दुष्परिणाम खडसावून सांगितले.

आईवडील तुम्हाला कॉलेजमध्ये चांगलं शिक्षण घेण्यासाठी पाठवतात. आपली मुलं चांगला अभ्यास करून जीवनामध्ये मोठं यश संपादन करतील या आशेनं, किती विश्वासानं शैक्षणिक खर्चाचा भार उचलतात आणि तुम्ही असे अनैतिक संबंध ठेवून आईवडिलांच्या विश्वासाला व मैत्रीच्या नात्याला तडा जाऊ देता. असे स्वैराचारी अनैतिक संबंध ठेवताना तुम्हाला आपल्या संस्कृतीचा, नीतिमत्तेचा विसर पडला आहे का? माझे बोलणे ऐकल्यावर तिचा मित्र म्हणाला, मॅडम, आम्हाला ही जाणीव आहे. आम्ही मन लावून अभ्यास करतो. कायम एकत्र राहिल्यामुळे तारुण्यामध्ये नैसर्गिकपणे निर्माण होणाऱ्या कामवासनांना आम्ही बळी पडलो. आमच्याकडून चूक झाली. इथून पुढे परत असं घडणार नाही.''

हे ऐकून मी म्हणाले,

चूक कबूल केली म्हणजे सर्व माफ होईल असं नाही. याचे परिणाम शरीरावर, मनावर व त्याद्वारे तुमच्या भविष्यातील जीवनावर होतात. वारंवार क्युरेटीन केल्यामुळे जंतुसंसर्गाची लागण होते, भविष्यामध्ये कदाचित वंध्यत्वाची समस्या निर्माण होते. तसेच गर्भनिरोधक गोळ्या घेतल्यामुळे शरीरातील हार्मोन्सचे असंतुलन होते. त्यातून विविध विकार जडतात. रिना, तुला हा त्रास केवळ अनैतिक संबंधामधूनच होतो आहे. त्यामुळे हा प्रकार लगेच थांबवा. मी औषधं लिहून देते. ती व्यवस्थित घे व इथून पुढे फक्त अभ्यासावर लक्ष केंद्रित करा.

तुमच्या अनैतिक संबंधामुळे भविष्यात आयुष्यभर साथ देणाऱ्या जोडीदाराचा तुम्ही विश्वासघात करत आहात. तुमच्याबरोबर त्या जोडीदाराचे आयुष्य उद्ध्वस्त होऊ शकते याचे भान ठेवा.

माझे बोलणे ऐकल्यानंतर दोघांनीही शरमेने मान खाली घातली. मॅडम, आम्हाला माफ करा, इथून पुढं आमच्याकडून अशी चूक घडणार नाही. आम्हाला अशा दुष्परिणामांची जाणीव नव्हती ती तुम्ही आम्हाला करून दिली त्याबद्दल धन्यवाद!

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ–महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर मोबाईल नं– ८७९३४००४००

# सरोज आल्हाट यांना राजे शिवछत्रपती प्रेरणा 'राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार' जाहीर



नगर – येथील कवयित्री व मुक्त पत्रकार सरोज आल्हाट यांना राजे शिवछत्रपती प्रेरणा राज्यस्तरीय समाज रत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. समाजसेवेत अग्रेसर असणाऱ्या माणुसकी मल्टीपर्पज फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य या समाजसेवी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विवेक राजापुरे यांनी या पुरस्काराची घोषणा केली.

सरोज आल्हाट या गेल्या २५ वर्षापासून संपूर्ण महाराष्ट्रात सामाजिक साहित्यिक व पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांच्या सर्व क्षेत्रातील प्रेरणादायी कामाची दखल घेऊनच त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा ८ जून रोजी बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर येथे होणार आहे.

सरोज आल्हाट या वयाच्या दहाव्या वर्षापासूनच काव्य लेखन करीत असून त्यांचे अश्रूंच्या पाऊलखुणा, सखे, कविता तुझ्या नि माझ्या, अनन्यता असे ४ काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. अनेक इंग्रजी व मराठी मासिकांचे त्यांनी संपादन केले असून मराठी व इंग्रजी वृत्तपत्रांमध्येही त्यांच्या लेख व कविता प्रसिद्ध झाल्या आहेत.

प्रकल्प संचालक, जनरल सेक्रेटरी अशा उच्च पदावर राहून सामाजिक संस्थांच्या माध्यमातून दलित, शोषित, पीडित, आदिवासी, बालकल्याण, परित्यक्ता, आरोग्य समस्या, युवकांचे प्रश्न, कुष्ठरुग्ण, वीट भट्टी व ऊसतोड कामगार, एड्सग्रस्त आदींसाठी विकासात्मक व धोरणात्मक कार्यक्रमांमध्ये त्या गेली तीस वर्षापासून काम करीत आहेत. अनेक संस्था, रेडिओ तसेच साहित्यातून त्यांनी प्रबोधन पर व्याख्याने दिली आहेत. स्वर्गीय राजीव गांधी, मदर तेरेसा आदींनी त्यांच्या कार्याची दखल घेतली आहे.

अखिल भारतीय पातळीवरील इंग्रजी निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक तसेच राज्यस्तरीय आठवले साहित्य पुरस्कार, राजीव गांधी पुरस्कार, स्वानंद काव्य पुरस्कार कविरत्न पुरस्कार, राष्ट्र मित्र पुरस्कार, शासनाचा जिल्हा नेहरू युवा पुरस्कार, समाज ज्योत पुरस्कार, यमुना पर्यटनकार बाबा पद्मजी स्मृती पुरस्कार, अभिनव खानदेश, प्रेरणादायी महिला पुरस्कार, इंडियन पिनॅकल आर्ट, आयकॉन नॅशनल अवॉर्ड २०२४ आदी राज्य व देश पातळीवरील विविध पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. सन्मान 'कर्तुत्वाचा... सामाजिक जाणीवेचा' या सोहळ्यात मानाचा फेटा, सन्मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन सदर पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याचे संस्थेने कळविले आहे.

# भगवंतासाठी प्रसाद बनवतोय या भावनेने स्वयंपाक केल्यास घरात सकारात्मक बदल दिसतील : प्रविणऋषीजी महाराज



आनंदधाम येथे प्रविणऋषीजी म.सा. हे 'आओ रसोई घरको मंदिर बनाए' या विषयावर व्याख्यान देताना समोर उपस्थित महिला वर्गाची झालेली गर्दी दिसत आहे.

## 'आओ रसोईघर को मंदिर बनाये' विषयावर विशेष व्याख्यान

नगर – अन्न सेवन करणे ही प्रत्येक सजीवाची गरज आहे. मनुष्य ज्या प्रकारचे अन्न खातो तसे त्याचे भाव, वर्तणूक असते. त्यामुळे जी गृहिणी घरात सगळ्यांसाठी भोजन तयार करते तिला अतिशय महत्व आहे. स्वयंपाक करताना तिच्या मनात भाव अन्नात उतरत असतात. ती दुःखी, रागावलेली असेल तर तिच्या हातचे अन्न खाणाऱ्याच्या मनातही तसेच भाव तयार होतात. यातून सगळ्या परिवारावर परिणाम होतो. त्यामुळे गृहिणीने स्वयंपाक करताना मन प्रसन्न ठेवायला हवे. भगवंतासाठी प्रसाद बनवताना मन आनंदी, प्रसन्न असते. त्याच पद्धतीने आपण परिवारासाठी स्वयंपाक करताना प्रसाद बनवत आहोत अशी भावना ठेवल्यास अनेक चांगले बदल दिसून येतील. प्रत्येक घरातील स्वयंपाकघर मंदिर बनल्यास अनेक सुखद अनुभव येतील असे मार्गदर्शन उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी महाराज यांनी केले.

आनंदधाम येथे प्रविणऋषीजी महाराज यांचे आओ रसोई घर को मंदिर बनाये या विषयावर खास महिलांसाठी मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सुमारे १२०० महिलांनी हजेरी लावून एक नवीन विचार आत्मसात केला.

प्रविणऋषीजी महाराज यांनी सांगितले की, भगवंतासाठी केलेला प्रसाद ग्रहण केल्यानंतर प्रत्येकाला आत्मिक समाधान लाभते. कारण तो प्रसाद सात्विक भावनेने तयार केलेला असतो. परिवारातील प्रत्येक सदस्यात आत्मा म्हणजेच परमात्मा असतो. त्यामुळे आपण परमात्म्यासाठी भोजन अथवा प्रसाद बनवत आहोत हा भाव मनात असायला हवा. आपल्याकडे पूर्वी घरात जिथे अन्न तयार केले जाते त्याला रसोईघर म्हटले जायचे. आता रसोईघरचे किचन झाले आहे. त्यामुळे घरात कायम किचकिच वाढली आहे. याला अनेक कारणे आहेत. स्वयंपाक करणारी गृहिणी आनंदी असेल तर अन्नही मनात आनंद निर्माण करते. गृहिणीचे कोणाशी भांडण झाले असेल, ती चिडलेली, संतापलेली असेल आणि त्याच अवस्थेत तिने स्वयंपाक केला तर ते अन्न खाणाऱ्याच्या मनातही तसेच भाव तयार होतात आणि सगळ्याच परिवाराचे मानसिक स्वास्थ्य बिघडते. यासाठी गृहिणींनी आपल्यात बदल केला पाहिजे. भोजन करताना परमात्मा डोळ्यासमोर ठेवल्यास आपोआप मनात सात्विक भाव तयार होतील. त्यामुळे स्वयंपाक सात्विक होऊन ते ग्रहण करणाऱ्याचे मनही सात्विक होईल. प्रत्येकीने हा प्रयोग निश्चित करावा. घरातील सदस्यांच्या वर्तणुकीत अनेक सकारात्मक बदल निश्चितच पहायला मिळतील असे मार्गदर्शन प्रविणऋषीजी महाराज यांनी केले.

# जिंकणे हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि मी जिंकणारच

## उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी महाराज यांनी प्रवचनातून दिला जीवन जगण्याचा मंत्र



प्रविणऋषीजी महाराज यांचे 'आज और कलकी चुनौती' या विषयावर प्रवचन झाले. त्यांच्यासमवेत तीर्थेशऋषीजी महाराज होते.

नगर – वर्तमानात जगताना तसेच भविष्यातही प्रत्येकाला अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. वैयक्तिक, कौटुंबिक तसेच सामाजिक आयुष्यात अनेक समस्या असतात. त्यांचा यशस्वीपणे सामना करायचा तर मेडिटेशन आणि समर्पण भाव आवश्यक आहे. प्रत्येकाने मनात संकल्प केला पाहिजे की, जिंकणे हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि मी जिंकणारच, असे मार्गदर्शन उपाध्याय प्रवर, अर्हम विज्ञा प्रणेता प्रविणऋषीजी महाराज यांनी केले.

आनंदधामच्या पवित्र प्रांगणात गुरुवारी रात्री प्रविणऋषीजी महाराज यांचे 'आज और कलकी चुनौती' या विषयावर प्रवचन झाले. त्यांच्यासमवेत तीर्थेशऋषीजी महाराज होते. प्रारंभी नरेंद्र फिरोदिया, सुनील मुनोत, सी.ए. अशोक पितळे यांनी सर्वांचे स्वागत केले. यावेळी विलास कटारिया, संतोष शेटिया, सचिन देसर्डा, प्रविण कटारिया, सुनील बोरा आदी उपस्थित होते.

प्रविणऋषीजी महाराज यांचे अनमोल विचार ऐकण्यासाठी जैन बंधू भगिनी, युवक, युवती, लहान मुले उपस्थित होते. प्रविणऋषीजी महाराज यांनी अनेक उदाहरणे देत प्रत्येकाला आव्हानांचा सामना करण्यासाठी विचार मंत्र दिला. ते म्हणाले की, जीवनात आव्हाने नसतील तर प्रगती होऊ शकत नाही. आव्हानांचा अर्थ आहे की जुने रस्ते सोडून नवीन रस्त्यावर मार्गक्रमण करणे. आताच्या काळात वैयक्तिक आयुष्यात सगळ्यांना असे वाटते की, मी सगळ्यांमध्ये आहे पण माझं कोणी नाही. व्यक्ती स्वतःला हतबल मानतो, नैराश्य येते. त्याला अपयशाची भीती वाटते. आपल्याकडे यशस्वी होण्यासाठी सगळं शिकवलं जाते. पण अपयश कसे पचवायचे, अपयशाचा सामना कसा करावा हे शिकवले जात नाही. त्यामुळेच भगवान महावीरांनी एखादे कार्य करताना त्यातील नकारात्मक बाबींचा आधी विचार करावा आणि नंतर चांगल्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करावे अशी शिकवण दिली.

आपल्या गुरूंवर, भगवंतावर श्रद्धा ठेवा. अंधारात तुमची सावली तुम्हाला सोडून जाईल त्यावेळी गुरू तुमच्या सोबत असेल. आपला जन्म जिंकण्यासाठी झालेला आहे, जिंकणे हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे हे कायम मनात असू द्या. विश्वास आणि श्रद्धा महत्वपूर्ण आहे. प्रभू श्रीराम वनवासात होते तेव्हा त्यांसोबत लक्ष्मण होते. तिकडे अशोक वाटीकेत सीतामाई एकट्या होत्या. पण त्यांना विश्वास होता प्रभू श्रीराम आपली नक्की सुटका करतील. अशी श्रद्धा आपल्या भगवंताप्रती असली पाहिजे.

कौटुंबिक स्वास्थ्याबाबत मार्गदर्शन करताना प्रविणऋषीजी महाराज यांनी सांगितले की, कुटुंबात प्रत्येकाला वाटते आपण सगळ्यांसाठी खूप मेहनत करतो पण आपली कदर होत नाही. खरे तर गाढव सर्वाधिक मेहनत करतं पण पूजा गायीची होते. स्वतःला गाढव नाही तर गाय समजा. कौटुंबिक स्वास्थ्य चांगले राहण्यासाठी घरात कोणीही दुःखी झोपणार नाही याची काळजी घ्या. कारण घरात कोणीही दुःखी असेल तर सगळ्या घरावर त्याचा नकारात्मक परिणाम होतो.

परिवारातील प्रत्येकाने एकमेकांना समजून घेतले पाहिजे, एकमेकांच्या भावनांचा आदर केला पाहिजे. सामाजिक जीवनातही अनेक प्रकारचे आव्हाने आहेत. विशेषतः जैन समाजासमोर तर मोठे प्रश्न आहेत. जैन म्हणून जैनांची वेगळी ओळख राहिलेली नाही. कारण आपल्याला स्वतःलाच जैन तत्वज्ञानाची पूर्ण माहिती नसते. यासाठी आधी जैनिझम काय आहे हे समजून घेणे गरजेचे आहे. अर्हम विज्ञा अभियान याचसाठी सुरू आहे. त्याचा भाग बनला. जैन म्हणून ओळख निर्माण झाल्यावर सामाजिक जीवनातील अनेक प्रश्नांची उकल होईल. आपल्या पुढच्या पिढींवर चांगले संस्कार होतील असे मौलिक विचार प्रविणऋषीजी महाराज यांनी मांडले. शेवटी मंगलपाठाने प्रवचनाची सांगता झाली. सूत्रसंचालन स्वप्ना कटारिया आणि माया धोका यांनी केले.



कामगार दिनानिमित्त स्नेह–७५ व सायंतारा ग्रुपच्यावतीने प्राथमिक स्वरुपात कामगारांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी श्रीकांत अष्टेकर, डॉ.अस्मिता अष्टेकर, डॉ.विनोद सोळंकी, सागर अष्टेकर, प्रमोदकुमार छाजेड, शोभा लोखंडे, किशोर खेमनार, हनुमान गायकवाड, पूजा पवार, झेबा शेख आदि. (छाया – विजय मते)

# कामगार हा व्यावसायिकांचा कणा

## श्रीकांत अष्टेकर यांचे प्रतिपादन; स्नेह–७५–सायंतारा ग्रुपतर्फे कामगार दिन साजरा

नगर – कष्ट हे प्रत्येकाला करावेच लागते. कष्टाशिवाय पर्याय नसतो. एखादा उद्योजक, बांधकाम व्यावसायिक, हॉटेल व्यवसायिक, दुकानदार हे सर्व आपल्या कामगारांच्या विश्वासावर व्यवसायात प्रगती करत असतात. कामगार हा व्यावसायिकांचा कणा आहे. अशा या कामगारांना रोजच मान–सन्मान दिला पाहिजे, असे प्रतिपादन श्रीकांत अष्टेकर यांनी केले.

१ मे महाराष्ट्र – कामगार दिनानिमित्त स्नेह–७५ व सायंतारा ग्रुपच्यावतीने प्राथमिक स्वरुपात कामगारांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी श्रीकांत अष्टेकर, डॉ.अस्मिता अष्टेकर, डॉ.विनोद सोळंकी, सागर अष्टेकर, प्रमोदकुमार छाजेड, शोभा लोखंडे, किशोर खेमनार, हनुमान गायकवाड, पूजा पवार, झेबा शेख आदि उपस्थित होते.

कामगार दिनानिमित्त त्यांची डॉ.अस्मिता अष्टेकर व डॉ.विनोद सोळंकी यांनी आरोग्य तपासणी केली. या उपक्रमाचे सर्वांनी कौतुक केले.

झेबा शेख यांनी सूत्रसंचालन केले तर प्रमोदकुमार छाजेड यांनी आभार मानले.

# चंदुकाका ज्वेल्स्, सावेडीत सुवर्ण ग्राहकांसाठी अक्षय्यतृतीयेनिमित्त 'सोनेरी फायदा योजना'

नगर – सावेडी स्थित चंदुकाका ज्वेल्स सुवर्णग्राहकांसाठी घेवून आले आहेत खास अक्षय्यतृतीया सोनेरी फायदा योजना.. या योजने अंतर्गत आपणांस भरपुर फायदा मिळणार आहे. एकतर आपण फक्त १०% रक्कम भरून आपले सोने बुक करू शकता. त्यानंतर बाजारात कितीही चढ उतार आले तरी त्याची तुम्हांला काहीही टेन्शन घेण्याची गरज राहिलेली नाही. कारण तुम्ही ज्या दिवशी सुवर्णखरेदी कराल त्या दिवशीचा सोन्याचा दर व बुकिंग केलेल्या दिवशीचा सोन्याचा दर यापैंकी जो दर कमी असेल त्या दरात आपण सोने खरेदी करू शकता. शिवाय याहुनही अधिक म्हणजे तुम्ही खरेदी करत असलेल्या सोन्यावर तुम्हाला प्रतीग्रॅम ३३/– सूट देखील मिळणार आहे. म्हणजे सुवर्णग्राहकांचा फक्त फायदाच नाही तर डबल फायदा.

ही योजना ही २२ कॅरेट दागिन्यांवर लागू आहे. योजना १ ते १० मे पर्यंतच चालू असल्याने अधिकाधिक सुवर्णग्राहकांनी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन संचालकांनी केले आहे.

प्रत्येकाला सुवर्णखरेदीवर ऑफरचा लाभ मिळावा हा या मागील उद्देश असतो. आमच्या येथे नेहमीच नविन आणि लेटेस्ट फॅशनने परिपुर्ण अलंकार हजर स्टॉकमध्ये उपलब्ध असतात. कुंदन, टेम्पल, कलकत्ती व स्टोन सेटींगमधील दागिन्यांचे अप्रतिम डिझाईन्सचा भव्य श्रेणी आपल्यासाठी उपलब्ध आहे.

चंदुकाका ज्वेल्स ने खास आपल्या सुवर्ण ग्राहकांसाठी भविष्यातील फायद्याच्या सोने खरेदीसाठी सुवर्णसमृध्दी योजना आणली आहे. यामध्ये आपण आजच सहभागी होवून १० मासिक हप्ते भरा व योजना पुर्ण झाल्यावर दागिने खरेदी करतांना भरघोस फायद्यासह मजुरीवर देखील भरघोस सुट मिळवू शकतात.

खास सुवर्णग्राहकांसाठी विविध डिझाईन्समध्ये बकुळीहार, राणीहार, शाहीहार, नेकलेस, ठुशी, ताशीवमाळ, पाटल्या, बांगड्या, टॉप्स तसेच टेम्पल ज्वेलरीमध्ये बिंदी, बाजुबंद, टॉप्स्, झुमका, काप, नेकलेस, अंगठी, चोकर, पाटल्या, बांगड्या, ब्रासलेट, पदक व गंठणची भव्य श्रुंखला.. आपणांस हजर स्टॉकमध्ये उपलब्ध आहे.

चांदीमधील फॅशन ज्वेलरी फॉर्मिंगमधील (१ग्रॅम सोन्या–मधील) फॅशन ज्वेलरी, चांदी व सोन्या मधील आकर्षक फ्रेमही उपलब्ध.

चंदुकाका ज्वेल्स, सावेडी येथील सुवर्णखरेदी केलेल्या दागिन्यांची मोडतेवेळी कोणत्याही प्रकारची घट धरली जात नाही हे चंदुकाका ज्वेल्स्चे विशेष वैशिष्ट्ये. या विविध योजनांमुळे ग्राहकांना अधिकाधिक फायदा मिळणार आहे. तरी आमच्या सर्व ग्राहकांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन संचालकांनी केले आहे

# प्रगत विद्यालय व वि. ल. कुलकर्णी शाळेस रोटरी क्लब ऑफ प्रियदर्शनीतर्फे २ टॉयलेट

## प्रत्येकाने स्वच्छतेला महत्त्व दिले पाहिजे : प्रतिभा धूत



प्रगत विद्यालय व कै. वि.ल. कुलकर्णी शाळेत रोटरी क्लब ऑफ प्रियदर्शनी यांच्यावतीने श्रीगोपाल रामनाथ धूत फाउंडेशन अहमदनगर यांच्या सीएसआर फंडातून दोन फायबरचे टॉयलेट प्रदान करण्यात आले.

नगर – येथील दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे प्रगत माध्यमिक व उच्च माध्यमिक व कै. वि. ल. कुलकर्णी विद्यालयास रोटरी क्लब ऑफ प्रियदर्शनी यांच्यावतीने श्रीगोपाल रामनाथ धूत फाउंडेशन अहमदनगर यांच्या सीएसआर फंडातून दोन फायबरचे टॉयलेट प्रदान करण्यात आले.

यावेळी सोसायटीचे सेक्रेटरी सुनील रुणवाल, संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती विजयाताई रेखे, फाउंडेशनच्या प्रमुख प्रतिभा धूत, प्रियदर्शनीच्या अध्यक्षा सौ. देविका रेले, भाजपच्या सौ. गिता गिल्डा, संस्थेचे उपाध्यक्ष चंद्रशेखर कुलकर्णी, कार्यकारणी सदस्य किरण वैयकर, प्राचार्य सुनिल पंडित, मुख्याध्यापिका प्रतिभा धरम, मुख्याध्यापिका सौ.जोशी आदी उपस्थित होते .

यावेळी प्रतिभा धुत म्हणाल्या की, समाजामध्ये काम करत असताना आपण नेहमी स्वच्छतेला महत्त्व दिले पाहिजे. आपल्या घरापासून आपल्या शाळेपर्यंत स्वच्छतेची सवय लावून घेतल्यास भविष्यात सामाजिक काम करताना आपण सर्वत्र स्वच्छतेला महत्त्व देऊ. प्लास्टिक पासून अनेक प्रकारच्या वस्तू तयार करण्यासाठी प्लास्टिकचे संकलन करून त्यापासून बेंचेस व इतर उपयुक्त वस्तू तयार करण्यात याव्यात. जेणे करून टाकाऊ पासून टिकावू वस्तू तयार होतील.

यावेळी देविका रेले म्हणाल्या, माझ्या या वर्षीच्या कार्यक्रमात रोटरीच्या माध्यमातून अनेक शाळांना अनेक प्रकारचे ग्रंथालयातील पुस्तकासह अनेक मदत केल्याचे विविध उपक्रम राबवल्याचे सांगितले.

सौ. गीता गिल्डा म्हणाले, श्रीगोपाल रामनाथ धूत फाउंडेशन हे अहमदनगर शहरातील एक वेगळे सामाजिक फाउंडेशन असून या फाउंडेशना मार्फत शहरातील टाकावू प्लॅस्टिकच्या पाण्याच्या बाटल्या गोळा करून त्यामध्ये प्लास्टिकचे सर्व वस्तू, कागद पिशव्या त्यामध्ये भरून त्यापासून विद्यार्थ्यांना बसण्यासाठी या फाउंडेशनने बेंचेस बनविले. याच धरतीवर आपणही आपल्या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी पाच हजार वाटल्या प्लास्टिकच्या वस्तूंनी प्लॅस्टिकच्या पिशव्यांनी भरून दिल्यास आपल्याही शाळेला दिले जातील, असे जाहीर केले. तसेच लोकशाही मजबूत करण्यासाठी मुलांनी आपल्या पालकांना मतदानासाठी जागृत करून मतदान करण्यासाठी आवाहन करावे असे सांगितले.

यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष चंद्रशेखर वाल्मीक कुलकर्णी यांनीही या उपक्रमाचे कौतुक करुन शुभेच्छा दिल्या. सुनील रुणवाल यांनी संस्थेने १९७५ पासून आत्तापर्यंत केलेल्या शैक्षणिक कार्याची माहिती देऊन संस्था आता लवकरच एक मोठ्या जागेमध्ये शैक्षणिक संकुल निर्माण करणार असल्याचे सांगितले.

प्रास्ताविक सौ.जोशी यांनी केले तर परिचय प्राचार्य सुनील पंडित यांनी करुन दिला. सूत्रसंचालन सौ. बंड यांनी केले तर आभार सौ. प्रतिभा धरम यांनी मानले. यानंतर रोटरी क्लब ऑफ प्रियदर्शनी दिलेल्या दोन फायबर टॉयलेटचे उद्‌घाटन करण्यात आले.



आर्मी पब्लिक स्कूलमध्ये प्रतीक्षा रसाळ या गुणवंत विद्यार्थिनीचा सत्कार करताना मुख्याध्यापिका नूतन मिश्रा. समवेत माजी सैनिक तिचे वडील मच्छिंद्र रसाळ आदी.

# आर्मी पब्लिक स्कूलमध्ये प्रतीक्षा रसाळ हिचा सन्मान

नगर – येथील आर्मी पब्लिक स्कूलमध्ये इयत्ता सातवीमध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्याबद्दल प्रतीक्षा रसाळ हिचा शाळेत सन्मान करण्यात आला. स्कूलच्या मुख्याध्यापिका नूतन मिश्रा यांनी रसाळ हिचा सत्कार केला.

प्रतीक्षा रसाळ ही श्रीगोंदा तालुक्यातील माजी सैनिक मच्छिंद्र रसाळ यांची कन्या असून, इयत्ता पहिली पासून तिने शाळेत प्रथम येण्याचा मान पटकाविलेला आहे. माजी सैनिकांच्या जय हिंद फाउंडेशनच्या वतीने देखील रसाळ हिने मिळवलेल्या यशाबद्दल अभिनंदन करण्यात आले आहे.

# ४ मे रोजी 'मराठी पाउल पडते पुढे' या मराठमोळ्या मैफलीचे आयोजन

## विचार भारती व चैतन्य फाउंडेशनचे आयोजन




नगर – महाराष्ट्र दिनानिमित्त नगरच्या सामाजिक व प्रबोधनात्मक क्षेत्रात काम करणाऱ्या विचार भारती व चैतन्य फाउंडेशनच्यावतीने ४ मे रोजी 'मराठी पाउल पडते पुढे' या मराठमोळ्या गीतांच्या मैफलीचे आयोजन करण्यात आले आहे. सावेडी येथील माउली सभागृहात सायंकाळी ६ वाजता ही मराठी गाण्यांची मैफल होणार असल्याची माहिती विचार भारतीचे अध्यक्ष अरुण कुलकर्णी यांनी दिली.

विचार भारतीच्यावतीने शहरातील सज्जन शक्तीच्या एकत्रीकरणासाठी गेल्या वर्षापासून विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. त्यात सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात येत आहे. याआधी गीतरामायण, रागदारीवर हिंदी गाण्यांची मैफलीचे आयोजनानंतर उद्या महाराष्ट्र दिनानिमित्त 'मराठी पाउल पडते' पुढे या मराठमोळ्या मैफलीचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती विचार भारतीचे सचिव सुधीर लांडगे यांनी दिली.

आरोही निर्मत व अविनाश कुलकर्णी प्रोडक्शन प्रस्तुत या मैफलीत धवल चांदवडकर, स्वप्ना लेले, चैतन्य कुलकर्णी, रश्मी मोघे व केतकी कुलकर्णी हे प्रसिद्ध गायक मराठी गीते सादर करणार आहेत. या मैफलीसाठी सशुल्क राखीव प्रवेश आहे. माउली सभागृह येथे कार्यक्रमाच्या अगोदर सशुल्क प्रवेशिका मिळणार आहेत. अधिक माहितीसाठी चैतन्य फाउंडेशनचे अनंत देसाई मो.नं. ९४२३७९३५३० येथे संपर्क साधावा.

# आरुष बेंडेकरला सांस्कृतिक कलादर्पणचा सर्वोत्कृष्ट बालकलाकार पुरस्कार घोषित



नगर – मराठी रंगभूमीवर सध्या गाजत असलेल्या मिलाफ थिएटर टुगेदर निर्मित बोक्या सातबंडे या नाटकातील बोक्या या मुख्य भूमिकेसाठी आरुष प्रसाद बेडेकर याला नुकताच सांस्कृतिक कलादर्पण संस्थेचा सर्वोत्कृष्ट बालकलाकार पुरस्कार घोषित करण्यात आला. विशेष बाब म्हणजे आरुषसाठी या विशेष विभागाची निर्मिती करण्यात आली अशी माहिती आयोजकांनी दिली.

अल्पावधीतच रसिक प्रेक्षकांच्या आणि खास करून बाल रसिकांच्या मनात एक वेगळं स्थान निर्माण केलेलं बोक्या सातबंडे हे नाटक सध्या व्यावसायिक रंगभूमीवर चांगलाच धुमाकूळ घालत आहे. सांस्कृतिक कलादर्पण ही लेखक, दिग्दर्शक, शिक्षक, अभिनेते चंद्रशेखर सांडवे यांची संस्था आहे. त्यांच्या प्रतिष्ठानच्यावतीने प्रत्येक वर्षी 'सांस्कृतिक कलादर्पण' या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करत असते. नाटक, चित्रपट या क्षेत्रात योगदान देणाऱ्या कलाकार, तंत्रज्ञांचा सन्मान करणारा हा कार्यक्रम असतो. या निमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रमाचा उत्सव असतो.

यंदा या महोत्सवाचे २६ वे वर्ष आहे. शिवाजी मंदिर येथे सर्वोत्कृष्ट नाटकांच्या आणि चित्रपटांच्या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. २३ मे रोजी मुंबई येथे या पुरस्कारांचे वितरण नाटक आणि चित्रपट सृष्टीतील पाहुण्यांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे.

सांस्कृतिक कलादर्पण यांच्या वतीने देण्यात येणारा हा पुरस्कार मिळवणारा आरुष हा अहमदनगर जिल्ह्यातील पहिलाच बालकलाकार आहे. या आधी सुद्धा आरुषला म.टा. सन्मान, कलर्स मराठी अवॉर्ड, शंकर रत्न पुरस्कार, अ.भा.म. नाट्यपरिषद बोरीवली शाखा यांचा सर्वोत्कृष्ट बालकलाकार यासारख्या विविध पुरस्कारांनी गौरवण्यात आलं आहे.

# ‘कॉ. आबासाहेब काकडे हे तत्वनिष्ठ राजकारणी होते’

**प्रा.डॉ. सुधाकर शेलार**

नगर – आबासाहेब हे राजकारणासाठी राजकारण करणारे नव्हते. तर ते समाजकारणासाठी राजकारण करणारे होते, असे प्रतिपादन प्रा. डॉ. सुधाकर शेलार यांनी केले

शेवगावचे ॲड. डॉ. विद्याधर उर्फ शिवाजीराव काकडे लिखित ’आबासाहेब आणि मी’ या चरित्र ग्रंथाच्या व्दितीय आवृत्तीचे प्रकाशन समारंभ एन. एन. सध्या कॉलेज ऑफ फार्मसी, अहमदनगर या ठिकाणी प्रा. डॉ. सुधाकर शेलार यांचे हस्ते झाला. यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साहित्यिक व विनोदी वक्ते डॉ. संजय कळमकर हे होते. व्यासपिठावर प्रमुख पाहुणे माजी कुलगुरु डॉ. सर्जेराव निमसे, अहमदनगर महाविद्यालयाचे प्रा. डॉ. एम. बी. मेहता, या ग्रंथाचे लेखक ॲड. डॉ. विद्याधर काकडे तसेच जिल्हा परिषद सदस्या सौ. हर्षदाताई काकडे व अनंत कुलकर्णी हे उपस्थित होते. ग्रंथाचे प्रकाशन अहमदनगर महाविद्यालयाचे मराठी विभागाचे प्राध्यापक डॉ. सुधाकर शेलार यांच्या हस्ते झाले.



शेवगावचे ॲड.डॉ. विद्याधर उर्फ शिवाजीराव काकडे लिखित ‘आबासाहेब आणि मी’ या चरित्रग्रंथाच्या द्वितीय आवृत्तीचे प्रकाशन प्रा.डॉ. सुधाकर शेलार. समवेत माजी कुलगुरु डॉ. सर्जेराव निमसे, विनोदी वक्ते डॉ.प्रा. संजय कळमकर, प्रा.डॉ. एम. बी. मेहता, जि.प. सदस्या सौ. हर्षदाताई काकडे, अनंत कुलकर्णी.

यावेळी बोलतांना श्री. शेलार म्हणाले की, ’या पुस्तकाचे वाचन करतांना मला आबासाहेबांच्या व लेखक शिवाजीराव काकडे यांच्या नात्याची वीण समजत गेली. कॉ. आबासाहेब काकडे यांचे व्यक्तिमत्व समजले. आबासाहेब हे राजकारणासाठी राजकारण करणारे नव्हते. तर ते समाजकारणासाठी राजकारण करणारे होते. हे पुस्तक म्हणजे आबासाहेबांच्या कालखंडातील सामाजिक परिस्थितीचा दस्तऐवज आहे. त्यावेळी राजकारणात तत्वनिष्ठता पाळली जात असे.

आबासाहेबांनी शेतकरी कामगार पक्षाचे नेतृत्व केले व सतत कॉंग्रेसला विरोध केला आणि समाजासाठी तत्वनिष्ठ राजकारण केले. आबासाहेब हे राजकारणातील व समाजकारणातील प्रतिभावंत होते. हे पुस्तक अत्यंत वास्तवदर्शी माहिती देते. आबासाहेबांनी शेवगावला शाहिरी विद्यापीठ व्हावे, यासाठी प्रयत्न केले. पाणी प्रश्न सोडविण्यासाठी संघर्ष केला.

या पुस्तकात कॉ. आबासाहेब काकडे व लेखक शिवाजीराव काकडे यांच्या चरित्रांचा समावेश आहे. हे पुस्तक तत्कालिन सामाजिक व राजकीय परिस्थितीचा व बहुजनांच्या जीवनाचा दस्तऐवज आहे’, अशा प्रकारची समीक्षा त्यांनी केली व हे पुस्तक सर्वांनी वाचावे असे सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष साहित्यिक डॉ. संजय कळमकर यांनी आपल्या विनोदी शैलीतून सध्याचे राजकीय परिस्थिती व कॉ. आबासाहेबांच्या काळातील राजकीय परिस्थिती यांची तुलना सांगितली.

त्यावेळी ते म्हणाले की, ’पुस्तकाचे लेखक ॲड. शिवाजीराव काकडे यांना लेखक म्हणवून घेण्याची हौस नाही, परंतु आपल्या वडिलांचे कार्य त्यांनी समाजापुढे आणण्यासाठी हे पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकात सामाजिक मूल्ये आहेत. आपल्या जिल्हयातील अनेकांना या पुस्तकामुळे आबासाहेबांच्या कार्याचा परिचय झाला. हेच या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीचे यश आहे. तत्कालिन परिस्थितीत बहुजनांनी, शेतकऱ्यांनी आपले खर्च कमी करावेत. बडेजाव न करता साधेपणाने विवाह समारंभ करावे. खोटया प्रतिष्ठेपायी बहुजन समाजाचे नुकसान होते, म्हणून आबासाहेबांनी समाजजागृतीचे काम केले. या सर्व बाबींचा उल्लेख लेखकाने तटस्थपणे केला आहे.

हे पुस्तक वाचतांना तत्कालिन वास्तव डोळ्यासमोर येते. लेखक डॉ. शिवाजीराव काकडे यांनी आपल्या मनोगतातून पुस्तक लिहिण्यामागची प्रेरणा सांगितली. या साहित्यकृतीची उपयुक्तता पुढील पिढीसाठी व्हावी, असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजन समितीचे प्रमुख संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. लक्ष्मणराव बिटाळ यांनी केले. तर पाहुण्यांचे स्वागत लेखक डॉ. शिवाजीराव काकडे यांनी केले. आभारप्रदर्शन राष्ट्रीय पाठशाळा हायस्कूलचे मुख्याध्यापक जगन्नाथ बोडखे यांनी केले. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य हर्षदाताई काकडे उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक गोविंद वाणी यांनी केले.

कार्यक्रमप्रसंगी ॲड. सुभाषराव भोर, डॉ. एम.बी. मेहता, डॉ. नामदेव पंडीत, डॉ. राहुल मुथ्था, सेवानिवृत्त अभियंता हरिभाऊ बोडखे, जिल्हा परिषदेचे अभियंता रमेश शिदोरे, इंजिनियर सुधाकर मिसाळ, सुनिल कात्रे, संजय डोंगरे, विजय परदेशी, प्राचार्य डॉ. विशाल पांडे, प्राचार्य डॉ. मच्छिंद्र फसले, विकास गवळी तसेच आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहातील विविध शाखांचे प्राचार्य, उपप्राचार्य, मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक व राष्ट्रीय पाठशाळाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, एन. एन. सथ्था कॉलेज ऑफ फार्मसी व जनशक्ती ज्युनियर कॉलेजचे प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

# पटावर चाल देऊन अखिल भारतीय खुल्या क्लासिकल आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धेचा नगरमध्ये शुभारंभ

नगर – बडीसाजन मंगल कार्यालय येथे शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशन प्रायोजित अखिल भारतीय खुल्या बुद्धिबळ स्पर्धेचा शुभारंभ लाकडी बुद्धिबळ पटावर चाल देऊन करताना उद्योजक नरेंद्र फिरोदिया, बुद्धिबळ संघटनेचे सचिव यशवंत बापट, खजिनदार सुबोध ठोंबरे, विश्वस्त पारुनाथ ढोकळे, संजय खडके, प्रकाश गुजराती, दत्ता घाडगे, नवनीत कोठारी, देवेंद्र ढोकळे, सुनील जोशी, देवेंद्र वैद्य,अनुराधा बापट, डॉ.स्मिता वाघ, रोहिणी आडकर, पंच प्रवीण ठाकरे, शार्दूल टापसे, यशवंत पवार आदी उपस्थित होते.



अखिल भारतीय खुली क्लासिकल आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धीबळ स्पर्धेचे पटावर चाल देऊन उद्‌घाटन करताना उद्योजक नरेंद्र फिरोदिया, यशवंत बापट, सुबोध ठोंबरे, पारुनाथ ढोकळे आदी.

याप्रसंगी विविध बुद्धीबळ स्पर्धेत उत्कृष्ट खेळ व उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या नगरमधील गुणवंत खेळाडू सुयोग वाघ, देवेंद्र वैद्य, आशिष चौधरी, वेदांती इंगळे, हर्ष घाडगे, प्रज्वल आव्हाड यांचा सत्कार जिल्हा बुध्दीबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते करण्यात आला.

या स्पर्धेत बुद्धिबळ खेळण्यासाठी खेळाडू महाराष्ट्रासह, गुजरात, आंध्र प्रदेश, दिव, दमन, गोवा, तमिळनाडू इत्यादी राज्यातून ३६० खेळाडूं सहभागी झाले असून १७२ आंतरराष्ट्रीय मानांकन असलेले खेळाडू आहे. इंटर नॅशनल मास्टर विक्रमादित्य कुलकर्णी सहित अनेक दिग्गज खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले असून साडेपाच वर्षाचा बाळ खेळाडू तसेच ८३ वर्षाचे वयस्कर खेळाडूंनी देखील सहभाग नोंदविला.

स्पर्धेत प्रस्तविकेत यशवंत बापट म्हणाले की, नरेंद्र फिरोदिया यांनी वेगळा उपक्रम महाराष्ट्रात घेण्यासाठी १९ जुलैला बिलो १६०० ही मोठी टूर्नामेंट स्पर्धा आयोजित करण्यात आली असून संघटने विषयी माहिती दिली.

प्रमुख पाहुणे नरेंद्र फिरोदिया म्हणाले की, बुद्धिबळ खेळाडूंना दरवर्षी एकच स्पर्धा घेतली जाते त्यामुळे बदल हा झाला पाहिजे या हेतूने यावर्षी आजच्या स्पर्धेपासून नवीन १०० लाकडी चेस बोर्ड यावर सर्व खेळाडू आपल्या बुद्धिबळाचे खेळ खेळणार आहे. ही संकल्पना राज्यात कुठेही नसून ही फक्त आपल्या जिल्हा बुद्धिबळ संघटने कडे असल्याचे सांगितले व या स्पर्धेत आठ राज्यातून खेळाडू आले असून दरवर्षी नवीन खेळाडू या स्पर्धेत खेळण्यासाठी येत असून खेळाडूंची संख्या वाढत असल्याची भावना व्यक्त केली.

या स्पर्धेत पंच म्हणून प्रवीण ठाकरे, शार्दुल टापसे, यशवंत पवार हे जबाबदारी पार पाडणार आहेत. सूत्रसंचालन पारुनाथ ढोकळे यांनी केले तर आभार सुबोध ठोंबरे यांनी मांनले.

# काकासाहेब म्हस्के स्मृती पुरस्कारांचे ५ मे रोजी वितरण

नगर – माजी आमदार कै. कि.बा उर्फ काकासाहेब म्हस्के यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त दरवर्षी देण्यात येणाऱ्या स्मृती पुरस्काराचे वितरण ५ मे रोजी सकाळी १० वा. बोल्हेगाव फाटा येथील काकासाहेब म्हस्के शैक्षणिक संकुलात करण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे कार्यकारी विश्वस्त डॉ. सुभाष म्हस्के यांनी पत्रकार परिषदेत दिली.

डॉ.म्हस्के पुढे म्हणाले की, यंदाचा शिक्षणभूषण पुरस्कार नेवासा फाटा येथील त्रिमुर्ती पावन प्रतिष्ठान शैक्षणिक समुहाचे संस्थापक साहेबराव घाडगे पाटील यांना, वृत्तभूषण पुरस्कार अहमदनगर येथील पत्रकार मोहनीराज लहाडे यांना, समाजभूषण पुरस्कार माजी नगरसेवक भाऊसाहेब उडाणशिवे यांना, साहित्यभूषण पुरस्कार टाकळी खातगाव (ता.नगर) येथील साहित्यिक गिताराम नरवडे यांना, तर आरोग्यभूषण पुरस्कार ब्राम्हणवाडा (ता. अकोले) येथील डॉ.हबीब शेख यांना देण्यात येणार असल्याचे ते म्हणाले.

तसेच जेष्ठ कृषीतज्ञ कै.भास्करराव म्हस्के यांच्या स्मृतीप्रित्यर्थ देण्यात येणारा यंदाचा कृषिमित्र हा विशेष पुरस्कार कृषी क्षेत्रातील योगदानासाठी महाराष्ट्र शासनाच्या शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्काराचे विजेते, माजी जिल्हा परिषद सदस्य ॲड.सचिन जगताप यांना देण्यात येणार असल्याची माहिती डॉ.म्हस्के यांनी दिली.

आळंदी येथील हभप डॉ.नारायण महाराज जाधव हे कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून उपस्थित राहणार असून यावेळी आमदार लहू कानडे, माजी आमदार चंद्रशेखर कदम, ॲड. राहुल म्हस्के आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

तसेच सायंकाळी काकासाहेब म्हस्के शैक्षणिक संकुलात सांस्कृतिक कार्यक्रम व पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले असून यावेळी विंग कमांडर श्री. व सौ. रवी पारसनीस व मराठी चित्रपट सृष्टीतील अभिनेते संदीप पाठक यांची विशेष उपस्थिती राहणार असल्याचे डॉ.म्हस्के म्हणाले.

# जिद्द, चिकाटी आणि परिश्रम म्हणजे यशप्राप्ती

**ॲड. एस. एस. बलदोटा यांचे प्रतिपादन**

नगर – आजच्या आधुनिक युगात विद्यार्थ्यांना यशस्वी होण्यासाठी त्यांच्या अंगी जिद्द, चिकाटी आणि परिरम हे गुण असणे आवश्यक आहेत. विशेषत: मुलींनी स्वावलंबी होणे ही काळाची गरज आहे, असे स्पष्ट करुन विद्यालयास एक सामाजिक दायित्व म्हणून आर्थिक व भौतिक सर्वोतोपरी सहकार्य करणार असल्याचे आश्वासन नोटरी पब्लिक असो.चे सचिव ॲड. एस. एस. बलदोटा यांनी केले आहे.



माणिकताई करंदीकर विद्यालयात निकालाचे वाटप करताना ॲड. एस.एस. बलदोटा.

जानकीबाई आपटे बालिकाश्रम संस्थेच्या माणिकताई करंदीकर हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, अ.नगर येथे १ मे महाराष्ट्र दिन व आंतरराष्ट्रीय कामगार दिवस संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त व मंत्री डॉ. गीता करंदीकर यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून नोटरी पब्लिक असोसिएशनचे सचिव ॲड. बलदोटा यांच्या हस्ते विद्यालयात झेंडावंदन आणि विद्यार्थ्यांना वार्षिक निकालाचे गुणपत्रक वाटप करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुण्यांचा सत्कार विद्यालयाच्या प्राचार्या सौ. सुनंदा ठाकर यांनी केला. पाहुण्यांचा परिचय ज्यु. कॉलेजचे प्रा. पांडुरंग म्हस्के यांनी तर सूत्रसंचालन सौ. शर्मिला कुलकर्णी आणि आभार प्राथ.मुख्याध्यापिका सौ. जाहेदा पठाण यांनी केले. यावेळी विद्यालयाचे सहशिक्षक प्रा. हिशोर अहिरे, अनिल सुद्रिक, सुहेल शेख व शिक्षकेतर कर्मचारी सुनील मुळे, सौ. अनुताई साळवे, बेग शरीफ उपस्थित होते.

# पॅरेलिसिसचे प्रकार आणि वेळेला महत्त्व

लाख लोकांपैकी भारतामध्ये १५० व्यक्तींना पॅरेलिसीस असतो. पॅरेलिसीस/अर्धांगवायू हा दोन मूळ कारणांमुळे होऊ शकतो रक्त पुरवठा कमी (Ischemic Stroke) किंवा मेंदूमध्ये रक्त कमी (Hemorrhagic Stroke) समजा, एखाद्या पेशंटला Ischemic Stroke कमी असेल तर त्या रुग्णामध्ये वेळेला म्हणजे हात/पाय कधी पासून जड पडले त्याला अत्यंत महत्त्व असते, समजा तो पशेंट ४ ते ५ तासांच्या आत हॉस्पिटलला पोचला तर RTPA नावाचे औषध देता येते जेणेकरुन अर्धांगवायूमध्ये सुधार होण्याचे शक्यता वाढते व मेंदूचा रक्त पुरवठा परत चालू होऊ शकतो व मेंदूमधील Ischemic Penumbra म्हणजे मेंदू मधील तो भाग जेथे मेंदूचे पेशी मृत झाल्यापासून वाचवता येतात व पुढील जीव घातक गोष्टी टळू शकतात.

साध्या भाषेत कोणत्याही पेशंटला देखना, दिखना, हात, पैर, बोल, चाल म्हणजे दिसायला/हात जड/पाय जड/ बोलायला त्रास चालायला त्रास होत असल्यास तातडीने अर्धांगवायू/पॅरेलिसीची शक्यता धरुन तातडीने हॉस्पिटलला ॲडमिट केले पाहिजे. पॅरेलिसीस हा तरुण लोक म्हणजे ४० व कमी वयोगटात पण आढळला जातो. वेळोवळी ब्लडप्रेशर, शुगर चेक करणे, व्यसनमुक्त राहणे, नियमीत व्यायाम करणे या गोष्टींमुळे पॅरेलिसीस टाळता येऊ शकतो.



**डॉ. अद्वैत गिते**
एम.बी.बी.एस., एम.डी. मेडिसीन डी.एम. (न्युरॉलॉजी) अक्षय गिते हॉस्पिटल, बालिकाश्रम रोड, अहमदनगर

# पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना महाराष्ट्रदिनी तिरंगा ध्वजाची प्रतिमा भेट

नगर – महाराष्ट्र राज्याच्या ६५ व्या स्थापना दिनानिमित्त जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना स्नेहबंध फाउंडेशनतर्फे संस्थापक अध्यक्ष डॉ.उद्धव शिंदे यांनी तिरंगा ध्वजाची प्रतिमा भेट दिली. पोलिस मुख्यालयाच्या मैदानावर महाराष्ट्र दिनाच्या स्थापना दिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण जिल्ह्याचे पालकमंत्री विखे पाटील यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी डॉ. शिंदे यांनी ही प्रतिमा पालकमंत्र्यांना दिली. पालकमंत्री विखे पाटील यांनी या प्रतिमेचे निरीक्षण केले. महाराष्ट्र दिनानिमित्त शहरातील सर्वात उंच असलेल्या तिरंगा ध्वजाची प्रतिमा भेट दिल्याबद्दल डॉ. शिंदे यांचे त्यांनी आभार मानले. यावेळी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला, महानगरपालिका आयुक्त पंकज जावळे, उपवनसंरक्षक सुवर्णा माने आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी सालीमठ यांनीही ही फोटोग्राफी आहे की पेंटिंग आहे अशी विचारणा करत या प्रतिमेचे कौतुक केले.



पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना तिरंगा ध्वजाची प्रतिमा भेट देताना स्नेहबंधचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे.

## श्री वल्लभाचार्य प्रकटोत्सवानिमित्त ५ मे रोजी रक्तदान शिबीर

नगर – आचार्य भुमंडाचार्य जगद्गुरु श्रीमहाप्रभुजी श्री वल्लभाचार्य यांच्या ७४७ व्या प्राकट्योत्सवानिमित्त रक्तदान शिबीर ५ मे रोजी सकाळी ९ ते ३ या वेळेत विसानागर महाजन ट्रस्ट, श्रीमहाप्रभुजी मार्ग जुना कापड बाजार, नगर येथे आयोजित करण्यात आले आहे.

रक्तदान करावे, असे आवाहन प्रायोजक वैष्णव नागरी सहकारी पतसंस्था, व श्री. विसानागर वडनागरा महाजनवाडी ट्रस्ट व जनकल्याण रक्तकेंद्रच्या वतीने करण्यात आले आहे.

# आम्लपित्त कारणे आणि उपाय

शरीराचे बल, वर्ण, बुद्धी, रोगप्रतिकारक शक्ती हे सर्व पचनावर अवलंबून असतात. त्यामुळे घेतलेल्या अन्नाचे चांगले पचन झाले की या सर्व बाबी उत्तम प्रकारे निर्माण होतात आणि शरीर निरोगी राहते.

मात्र याउलट अन्नाचे पचन चांगले न झाल्यास ते अन्न अर्धवट पचलेल्या अवस्थेमध्ये आतड्यांमध्ये पडून राहते, यालाच ’अजीर्ण’ असे म्हणतात. हे अजीर्ण वेगवेगळ्या रोगांचं कारण ठरतं, त्यातील एक व सर्वसामान्यपणे सर्वत्र आढळणारा आजार म्हणजे ’आम्लपित्त’.

भुकेच्या प्रमाणात न खाणे अर्थात जास्त खाणे किंवा कमी खाणे, वेळी अवेळी खाणे, तिखट – तेलकट – मसालेदार पदार्थ सातत्याने आहारात असणे, अत्याधिक प्रमाणात मांसाहार, मद्यपान, शिळे अन्न, बेकरीचे पदार्थ, हिरवी मिरची, अतिरिक्त मिठाचे पदार्थ खाणे, याचबरोबर मानसिक ताणतणाव, घाईघाईने जेवण करणे, उन्हात किंवा गरम वातावरणात काम करणे आदी कारणांमुळे अन्नाचे पचन नीट होत नाही. अजीर्ण निर्माण होते आणि आम्लपित्त निर्माण होते. काही रुग्णांमध्ये आम्लपित्त हा विकार अनुवंशिक देखील असतो.

सुरुवातीला पोटात अथवा छातीत जळजळ होणे, घशाशी आंबट पाणी येणे, आंबट ढेकर येणे, पोट गच्च वाटणे, जेवणाची इच्छा न होणे, आंबट किंवा तिखट अशी उलटी होणे, पित्ताचा त्रास झाला असताना डोकेदुखी आणि पित्त पडून गेल्यानंतर ही डोकेदुखी कमी होणे, दिवसातून बऱ्याच वेळा शौचास होणे, पोट साफ होत असताना गुदभागी आग होणे किंवा त्यानंतरही बराच वेळ आग होणे, शौचाला काळ्या रंगाची होणे अथवा शौचा बरोबर किंवा नंतर रक्तस्त्राव होणे, मुळव्याधी सारखा त्रास होणे, दात घासताना पित्त पडणे, दात शिवशिवणे, चेहरा लाल होणे, उलटी होऊन पित्त न पडल्यास त्वचेवाटे बाहेर पडायला लागते आणि बऱ्याच वेळा त्वचेवर गांधी येतात. याचबरोबर अंग गळून जाणे, थकवा, अंगात बारीक ताप वाटणे, रागीटपणा अशी विविध लक्षणे आम्लपित्तामुळे दिसायला लागतात.

या अजीर्णाचे किंवा आम्लपित्ताचे परिणाम पुढे पचनशक्तीवर किंवा पोटामध्ये जखमा होणे (Different types of ulcers) अशा विविध गंभीर स्वरूपात दिसत असल्यामुळे केवळ घरगुती उपाय किंवा सांगोवांगी औषधे घेणे टाळावे. यासाठी आयुर्वेदामध्ये सांगितलेल्या विविध उपचारांचा विशेष फायदा होतो असे आढळलेले आहे. त्याकरता पचनशक्ती चांगली करणारी औषधे, अजीर्ण कमी करणारी औषधे, पित्त कमी करणारी औषधे यांचा वापर केला जातो. याचबरोबर आतड्यांना तसेच पचन क्रियेतील विविध अवयवांना ताकद देणाऱ्या औषधांचाही वापर करणे अपेक्षित असते.

पंचकर्म उपचारातील उलटीचे औषध (वमन) जुलाबाचे औषध (विरेचन) अथवा बस्तीचे औषध यांचाही वापर करण्यात येतो. या सर्व उपायांबरोबर अर्थातच पथ्याचे पालन करणे, आहाराचे नियोजन हे महत्त्वपूर्ण आहे. हे पथ्य वैद्यांकडून नीट समजून घेऊन त्याचे पालन सोबत केल्यास या किचकट अशा आजारापासून आपण स्वतःला दूर ठेवू शकतो.

या आणि अशा पचनाच्या विविध आजारांच्या उपचारांसाठी व मार्गदर्शनासाठी ’डॉ. कोटस्थाने आयुर्वेद क्लिनिक, पुणे’ येथील तज्ञ डॉक्टर आता ’अहिल्यानगर’ येथे दर महिन्याच्या पहिल्या शनिवारी खालील पत्त्यावर उपलब्ध असतात.

**– डॉ. सौ. पूजा कोटस्थाने**
ठिकाण – साई संजीवनी क्लिनिक, संदेश नगर, श्रीराम चौक, पाईपलाईन रोड, अहिल्यानगर.
संपर्क – ९५६१०८६८०१, ०२४१ – २४२४३२३

**– डॉ. समर्थ कोटस्थाने**
ठिकाण – मन:स्वास्थ्य आयुर्वेद चिकित्सालय, शहर बँकेसमोर, भिडे चौक, सावेडी, अहिल्यानगर.
संपर्क – ९५६१०८६८०१ / ९८२२१०७०३७

**प्रपत्र सी – २**

(संकेतस्थळ, वर्तमानपत्र, दूरदर्शन यामध्ये प्रसिद्ध करण्यासाठी राजकीय पक्षांकरिता)

**पक्षाने उभ्या केलेल्या उमेदवारांच्या गुन्हेगारी पूर्व चारित्राबद्दलचे घोषणापत्र :**

(माननीय सर्वोच्च न्यायालयाने रिट विनंती अर्ज (नागरी) क्रमांक २०११ या ५३६ (पब्लिक इंटरेस्ट फाऊंडेशन व इतर विरुद्ध यूनियन ऑफ इंडिया व इतर ) या प्रकरणी दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार)

राजकीय पक्षाचे नाव : **नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टी – शरदचंद्र पवार**
निवडणुकीचे नाव : **सार्वत्रिक निवडणूक लोकसभा २०२४**
राज्याचे /संघराज्य क्षेत्राचे नाव : **महाराष्ट्र राज्य**

| अ. क्र. (१) | मतदारसंघाचे नाव (२) | उमेदवाराचे नाव (३) | प्रलंबित फौजदारी प्रकरणे (४) | | फौजदारी अपराधांकरिता दोषसिद्ध ठरविलेल्या प्रकरणांबद्दलचा तपशील (५) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | न्यायालयाचे नाव प्रकरण क्रमांक व प्रकरणाची (प्रकरणांची) सद्य:स्थिती | संबंधित अधिनियमांची कलमे व अपराधाचे (अपराधांचे) संक्षिप्त वर्णन | न्यायालयाचे नाव व आदेशाचा (आदेशांचे) संक्षिप्त वर्णन | अपराधाचे (अपराधांचे) संक्षिप्त वर्णन व ठोठावलेली शिक्षा | जास्तीत जास्त ठोठावलेली शिक्षा |
| १. | ३७ अहमदनगर | निलेश ज्ञानदेव लंके | पोलिस स्टेशन सुपा त. पारनेर, जि. अहमदनगर, प्र. मा. क्र. ००७२/२०२३ दोषारोप दाखल केले नाही | भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८, ३४१, राष्ट्रीय राजमार्ग कायदा १९५६ कलम ८ ब, मुंबई पोलिस अधिनियम १९५१ कलम ३७(१), ३७ (३) सूपा चौक ता. पारनेर, नगर पुणे महामार्गावर रस्ता रोको आंदोलन केल्या मुळे तक्रार दाखल | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |
| | | | प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी पारनेर, जि अहमदनगर एस.सी.सी.नं. ७९५/२०२३ दोषारोप ठेवण्यात आलेले नाही. | दि. निगोशीएबल इन्स्टुमेंट ॲक्ट कलम १३८ जामीनदार असल्याने स्टेट बँक ऑफ इंडिया, सुपा त. पारनेर यांचा दिलेला धनादेश न वटल्यामुळे फिर्याद दाखल | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक

# विज्ञानवार्ता

## धूम एआय सॉफ्टवेअर इंजिनिअरची

एखादा इंजिनिअर रोबो बनवतो किंवा त्यामधील सॉफ्टवेअर बनवतो हे आपल्याला माहिती आहे. मात्र आता एक रोबोच सॉफ्टवेअर इंजिनिअर बनला आहे. अमेरिकेतील एका स्टार्टअप कंपनीने 'डेविन' नावाचा एक एआय सॉफ्टवेअर इंजिनिअर बनवला आहे.

हे एक नवे 'एआय' टूल आहे. अमेरिकन एआय लॅब कॉग्निशनने ते तयार केले आहे. हा जगातील पहिला एआय सॉफ्टवेअर इंजिनिअर असल्याचा कंपनीचा दावा आहे. कोडिंग, वेबसाईट आणि कोडिंग प्रोग्रॅमरची अनेक कामे तो सहजपणे करू शकतो. हा एआय इंजिनिअर त्याच्या सहकाऱ्यांनाही मदत करू शकतो. अर्थातच तो एक कुशल 'एआय इंजिनिअर' आहे. गरज भासल्यास तो संपूर्ण प्रोग्रॅमचे काम एकटा करू शकेल. एका सुप्रसिद्ध कंपनीने घेतलेल्या अभियांत्रिकी मुलाखतीत तो उत्तीर्ण झाला आहे. त्याच्यामध्ये अनेक फीचर्स असून तो अनेक कठीण कामे करू शकतो. सॉफ्टवेअर डेव्हलपमेंटमध्ये कोडिंग, डीबगिंगसारखी कामे करू शकतो. डेव्हिनमध्ये मशिन लर्निंग अल्गोरिदम वापरण्यात आले आहे.



## चंद्रावर बनणार मानवी तळ

पृथ्वीचा एकमेव नैसर्गिक उपग्रह म्हणजेच चंद्र नेहमीच मानवाला खुणावत राहिलेला आहे. मानवाचे चंद्रावर पहिले पाऊल पडण्याच्या घटनेला आता अर्धशतक उलटून गेले आहे. आता चंद्रावर मानवी वसाहत स्थापन करण्याची स्वप्ने मनुष्य प्रजाती पाहू लागली आहे. अमेरिकन अंतराळ संशोधन संस्था 'नासा'ने यासाठीची जय्यत तयारीही सुरू केली आहे. अर्थात ही मानवी वसाहत म्हणजे दीर्घपल्ल्याच्या अंतराळ मोहिमांसाठीचा एक 'थांबा' असेल. याचा अर्थ चंद्रावर एक मानवी तळ निर्माण केला जाईल व तेथून मंगळासारख्या ग्रहांकडे अंतराळयान पाठवले जाईल. ब्रिटिश खगोलशास्त्रज्ञ डॉ. मॅगी एडरिन पोकॉक यांनी चंद्रावर एक तळ बनवण्याच्या योजनेबाबत तसेच 'नासा'ची भविष्यातील मानवयुक्त 'आर्टेमिस' मोहीम याबाबतही आता सविस्तर माहिती दिली आहे. आपल्या सौरमंडळात पृथ्वीच्या सर्वात जवळ असलेला खगोल अर्थातच चंद्र आहे. सौरमंडळाच्या अन्य खगोलावर जाण्यासाठी बरेच दीर्घ अंतर कापावे लागणार आहे.

त्यामुळे थेट पृथ्वीवरूनच अशा दीर्घ प्रवासाला सुरुवात करण्याऐवजी चंद्रावरून केली तर ती अधिक सोयीची ठरू शकते. त्यामुळेच चंद्राविषयी 'नासा'ला आता पुन्हा एकदा रस वाटू लागला आहे. 'अपोलो' मोहिमांमध्ये अमेरिकेचे अंतराळवीर चंद्रावर जाऊन आले होते. आता ५० वर्षांनंतर 'आर्टेमिस' मोहिमेतून पुन्हा एकदा अंतराळवीर चंद्रावर जातील. डॉ. मॅगी एडरिन पोकॉक यांनी 'यूएनआयएलडी'शी बातचीत करीत असताना सांगितले की, 'नासा'ची आर्टेमिस मोहीम मानवाला चंद्रावर पाठवत आहे. पण तिचा मुख्य उद्देश चंद्राला एक स्टेजिंग पोस्टच्या रूपात वापरण्याचा आहे. 'नासा'नेही म्हटले आहे की, माणूस पृथ्वीबाहेर कसा राहू शकतो, हे पडताळून पाहण्यासाठीची ही मोहीम आहे.

एडरिन यांनी सांगितले की, चंद्रावर गुरुत्वाकर्षण कमी असल्याने तेथून अंतराळयान लाँच करणे सोपे ठरते. तेथून मंगळासारख्या अन्य ग्रहांवर जाणे माणसाला सोपे ठरू शकते. भविष्यात म्हणजेच आगामी तीस, चाळीस किंवा ५० वर्षांमध्ये चंद्रावर मानवी तळ असेल व तेथून अंतराळयान लाँच केले जाईल.

## चाला नऊ हजार पावले


चालण्यासारखा दुसरा चांगला व्यायाम नाही. आपल्याकडे वेदांमध्ये 'चरैवेति चरैवेति' म्हणजेच 'चालत राहा, चालत राहा' असे सांगणारी एक कथा आहे. त्याचा आरोग्याच्या दृष्टीनेही मतितार्थ घेता येऊ शकतो. व्यग्र जीवनात चालण्याचे महत्त्व लोकांना कळू लागले आहे. अनेकांनी स्वतः साठी एका दिवसात १० हजार पावले चालण्याचे टार्गेट ठेवले आहे. दिवसातून किमान २२०० पावले चालली पाहिजेत, असे सांगण्यात येते. परंतु नुकत्याच आलेल्या ब्रिटिश जर्नल ऑफ स्पोर्टस् मेडिसिनच्या अहवालात असे म्हटले आहे की, दररोज २२०० पावले देखील हृदयविकार आणि मधुमेहाचा धोका कमी करतात. मात्र ९ हजार पावले अधिक प्रभावी ठरल्याचेही सांगण्यात आले.



अर्थात एवढे चालल्यानंतरही आजारांचा धोका कमी होतो का? तर उत्तर नाही असे आहे. कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीचे प्राध्यापक कीथ बार म्हणतात, सुरुवातीला आपण किती चाललो हे मोजणे अनेकदा उपयुक्त ठरते. पण तुम्ही विंडशिल्फला त सातत्याने दररोज सुमारे ६ हजार किंवा ८ हजार पावले चाललात की, चालण्याच्या गतीकडे अधिक लक्ष देणे सुरू करा. चालण्यामुळे स्नायू आकुंचन पावतात. यामुळे पायातून रक्त हृदयापर्यंत पोहोचते. यामुळे हृदयावर ताण पडतो. यामुळे कालांतराने तुमचे हृदय अधिक मजबूत आणि कार्यक्षम बनते. जोरात चालणे म्हणजे जास्त कॅलरीज कमी करणे असा होत नाही, त्यामुळे हृदयाला बळ मिळते. अनेकांना प्रश्न पडतो की, घराच्या आत चालायचे की बाहेर ? यावर बार म्हणतात, जेव्हा तुम्ही घराबाहेर फिरता तेव्हा तुम्ही निसर्गाच्या अधिक जवळ असता. त्यामुळे चालण्यासोबतच ताणही कमी होतो. शक्य असल्यास बाहेर फिरणे फायदेशीर ठरते. वेगाने चालणे हे अधिक लाभदायक ठरत असते.

## गुरुच्या चंद्रावर जीवसृष्टी नाही?

आपल्या ग्रहमालिकेतील सर्वात मोठा ग्रह म्हणजे गुरू. शनीप्रमाणेच गुरूचेही अनेक चंद्र आहेत. त्यापैकी युरोपासारखे काही चंद्र नेहमीच खगोलशास्त्रज्ञांच्या कुतूहलाचा विषय बनलेले असतात. युरोपावर जीवसृष्टीची शक्यता असू शकते, असे आतापर्यंत मानले जात होते. याचे कारण म्हणजे युरोपावर असलेले पाणी आणि ऑक्सिजनचे अस्तित्व. मात्र आता एका नव्या संशोधनातून दिसून आले आहे की, युरोपावर जीवसृष्टीची शक्यता नाही!



नव्या संशोधनात आढळले की, जीवसृष्टीला पुरेसा ठरेल इतका ऑक्सिजन गुरूच्या या चंद्रावर निर्माण होत नाही. गुरूभोवती प्रदक्षिणा घालणाऱ्या जुनो अंतराळ यानाने दिलेल्या ताज्या आकडेवारीवरून याबाबतची माहिती समोर आली आहे. या चंद्राबाबत स्पष्ट न झालेली माहिती म्हणजे तेथील ऑक्सिजनचे प्रमाण. ताज्या आकडेवारीवरून दिसून येते की, तिथे पुरेसा ऑक्सिजन नाही. 'नेचर अॅस्ट्रॉनॉमी' या नियतकालिकात याबाबतच्या संशोधनाची माहिती प्रसिद्ध करण्यात आली आहे.

२०२२ मध्ये जुनो यानाने गरू व त्याच्या चंद्रांभोवती भ्रमण करीत असताना ही माहिती गोळा केली होती. या डेटाचा आता वापर करण्यात आला आहे. प्रिंसटन युनिव्हर्सिटीमधील जेमी सजाले आणि त्यांच्या टीमने हे संशोधन केले. त्यांनी सांगितले की, युरोपाचा पृष्ठभाग मोठ्या प्रमाणात हायड्रोजन वायू सोडतो. मात्र प्रति सेकंद केवळ १८ किलोग्रॅम ऑक्सिजन निर्माण करतो. आधीच्या कॉम्प्युटर मॉडेलद्वारे अनुमानित सुमारे एक हजार किलो प्रति सेकंद ऑक्सिजनच्या तुलनेत हे अतिशय कमी प्रमाण आहे. अर्थात तरीही तेथील स्थिती जीवसृष्टीला अनुकूल ठरू शकते असे फ्लोरिडा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे खगोलशास्त्रज्ञ मनस्वी लिंगम यांनी सांगितले.



## चार इंच शेपटाचे बाळ

एकेकाळी मानवाला शेपूट होती असे म्हटले जाते. आताही कधी कधी शेपूट असलेली मुलं जन्माला येत असतात. चीनमध्ये आता अशाच एका बाळाचा जन्म झाला असून त्याला चक्क चार इंच लांबीची शेपूट आहे ! हा प्रकार हांगझो चिल्ड्रन हॉस्पिटलमधील पेडियाट्रिक न्यूरोसर्जरीचे डेप्युटी चीफ फिजिशियन डॉ. ली यांनी जगासमोर आणला आहे. बाळाच्या जन्मानंतरची डॉक्टरांना ही स्थिती आढळून आली. डॉक्टर ली यांनी सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर केला आहे, ज्यामध्ये बाळाच्या कटीप्रदेशात शेपटीसारखा वाढलेला भाग दिसत आहे. या हाडविरहित असलेल्या भागाची लांबी अंदाजे १० सेमी (३.९ इंच) आहे. लॉक्ड स्पाईन ही एक प्रकारची स्थिती आहे, जिथे पाठीचा कणा आसपासच्या ऊतींशी असामान्यपणे जोडलेला असतो. ही जोड मणक्याच्या पायथ्याशी उद्भवते, असे डॉक्टर म्हणतात. एका वृत्तानुसार, बाळाच्या आईने मुलाची शेपूट काढण्याची इच्छा व्यक्त केली. मात्र डॉक्टरांनी मुलाची शेपटी न काढण्याचा विचार केला. ही शेपूट बाळाच्या मज्जासंस्थेशी क्लिष्टपणे जोडलेली असल्याने ती काढून टाकल्याने नुकसान होण्याची शक्यता आहे या समजुतीतून असा निर्णय घेण्यात आला. दक्षिण अमेरिकेतील गयाना येथे असाच प्रकार उघडकीस आला होता. मागील वर्षी जूनमध्ये शल्य चिकित्सकांनी १० दिवसांच्या बाळाची अशीच शेपूट यशस्वीरीत्या काढली होती.

## 'नेकलेस नेब्युला'



नेब्युला हे अनेक आकाराचे असतात. कधी त्यांची रचना एखाद्या प्राण्यासारखी दिसते तर कधी डोळे, हात अशीही दिसते. आता 'नासा'ने अशाच नेकलेसच्या आकाराच्या चमकदार नेब्युलाचे छायाचित्र टिपले आहे.

नासाच्या इन्स्टाग्राम हँडलवर पोस्ट केलेला हा 'कॉस्मिक ज्वेलरी' चा फोटो हबल स्पेस टेलिस्कोपने टिपला आहे. 'नेकलेस नेब्युला' म्हणून प्रसिद्ध असलेले हे ठिकाण पृथ्वीपासून १५ हजार प्रकाशवर्षांच्या अंतरावर आहे. फोटो पाहताच प्रथमदर्शनी एखादा दागिन्यातील हारच जणू भासत आहे. या चित्राबाबत नासाचे म्हणणे आहे की, ते सूर्यासारख्या जुन्या ताऱ्यांनी तयार केले आहे. पहिले दोन तारे एकमेकांभोवती फिरत राहिले. मग एक तारा विस्तारला आणि त्याच्या साथीदार ताऱ्याला घेरला. तथापि, लहान तारा त्याच्या साथीदार ताऱ्याभोवती फिरत राहिला. अशा प्रकारे 'नेकलेस नेब्युला' तयार झाला. नासाचे म्हणणे आहे की, तारे आणि वायूंचे हे कॉम्बिनेशन एखाद्या गळ्यातल्या हारासारखे दिसते. १३ मार्च रोजी पोस्ट केलेल्या या फोटोला आतापर्यंत ७० हजारांहून अधिक लाईक्स मिळाले आहेत. त्यावर अनेक कमेंटस्ही केल्या जात आहेत. लोक आश्चर्यचकित नजरेने या चित्राकडे पाहात आहेत. अवकाशात अशा अनेक गोष्टी आहेत, ज्या हळूहळू उजेडात येत आहेत. नासा त्यांच्यावर लक्ष ठेवून आहे.

## चित्ता माणसाळतो तेव्हा!

जगभरातील सर्वात वेगवान धावणाऱ्या प्राण्यांमध्ये चित्याचा प्राधान्याने समावेश होतो. पण, चित्ता केवळ फक्त वेगवान धावतो, असे नाही तर तो तितकाच हिंस्त्रही असतो. शिकार टिपण्यातील त्याचे कौशल्य देखील अंगावर शहारे आणणारे असते. एकंदरीत मनुष्याने या हिंस्त्र प्राण्यापासून दूर राहणेच योग्य असते. पण, असा हा चित्ता मनुष्याचे उत्तम मित्रही बनू शकतो, असे म्हटले तर ते एकवेळ गैर वाटेलही. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका व्हिडीओनुसार मात्र हे देखील प्रत्यक्षात घडते आहे.

डॉल्फ वोल्कर असे या व्यक्तीचे नाव असून तो या खतरनाक प्राण्याला गोंजारतो, हाताने खाण्यास देतो आणि इतकेच नव्हे तर चित्त्याशी उत्तम मैत्रीही निभावतो. गॅब्रिएल



नावाचा हा चित्ता देखील त्याच्याशी बरेच जमवून घेताना दिसून आला आहे. या मैत्रीचे कारण असे की, गॅब्रिएल खूप लहान असताना त्यावेळेपासून डॉल्फने त्याची काळजी घेणे सुरु केले होते. डॉल्फ त्याला हातानेच खाणे द्यायचा. यामुळे, उभयतात बरीच मैत्री निर्माण झाली आणि गॅब्रिएल माणसाळल्याने डॉल्फही आणखी निश्चित झाला. डॉफने या आपल्या अनोख्या मैत्रीचे काही व्हिडीओ आपल्या युट्यूब चॅनेलवर देखील पोस्ट केले आहेत. डॉफ आपल्या या चॅनेलवर गॅब्रिएलचे वर्णन करताना म्हणतो, 'मी २०१४ मध्ये प्रथमच गॅब्रिएलला भेटलो. त्यावेळी हा चित्ता केवळ १० महिन्यांचा होता. नंतर सातत्याने सहवासात राहिल्याने त्याला माझ्याबाबत विश्वास निर्माण झाला आणि आता तो मला उत्तमरित्या ओळखतो. गेली १० वर्षे एकत्र राहिल्याने उभयतात बराच स्नेह देखील निर्माण झाला आहे'.



## विषारी तलावांच्या गावा...

कझाकस्तानमध्ये एक ठिकाण असेही आहे, जे फक्त अणू चाचणी करण्यासाठीच ओळखले जायचे. जवळपास ४० वर्षांच्या कालावधीत येथे जमिनीवर आणि जमिनीखाली शेकडो चाचण्या घेण्यात आल्या. आज मात्र या ठिकाणाला अक्षरशः अवकळा आली असून येथील हवा तर प्रदूषित झाली आहेच. शिवाय, येथील तलावही विषारी झाले आहेत.

कझाकस्तानमधील ही जागा कधी काळी सोव्हिएत युनियनचा भाग होता. त्यावेळी या ठिकाणाला अणू चाचणी केंद्र म्हणूनच ओळखले जायचे. तेथे परवानगीशिवाय ना कोणाला आत जाता येत असे, ना बाहेर येता येत असे. सातत्याने अणू चाचणी होत असल्याने १८३०० स्क्वेअर किलोमीटर क्षेत्रात रेडियोॲक्टिव्ह कंटेमिनेशन पसरले. आता येथील परिस्थिती अगदीच बिघडली असून येथील तलावाला देखील ॲटोमिक लेक नावाने ओळखले जाऊ लागले आहे. आसपास राहणाऱ्या नागरिकांची तब्येत बिघडत चालली असून अगदी दुसऱ्या पिढीपर्यंत त्याचे दुष्परिणाम दिसून येऊ लागले आहेत.

सोव्हिएतने या ठिकाणी ४५६ अणू व हायड्रोजन बॉम्बची चाचणी घेतली. यातील सर्वात मोठा धमाका १५ जानेवारी १९६५ मध्ये झाला होता. त्यावेळी हिरोशिमावर टाकल्या गेलेल्या बॉम्बच्या तुलनेत ११ पटीने विध्वंसक स्फोटाची चाचणी येथे घेण्यात आली होती. आजही या ठिकाणी जाण्यास बंदी असून सुरक्षारक्षकही तेथे तैनात ठेवावे लागतात.

## घरट्यांची ओली कथा

आतापर्यंत गवताच्या काड्यांनी घरे बनवणारे अनेक पक्षी आपण पाहिलेले असतात. जिथे सुरक्षित जागा मिळेल, अशा ठिकाणी गवताच्या काड्यांपासून सुबक कलाकृतीसारखे सजलेली घरे अर्थातच लक्ष वेधून घेत असतात. मात्र, काही युरोपियन, आफ्रिकन पक्षी असेही असतात, जे अगदी ओली माती व तोंडातील लाळेच्या माध्यमातूनही आपली घरे तयार करतात.

ही घरे बऱ्याचदा भिंतीवर साकारलेली असतात. ही घरे इतकी मजबूत असतात की, एकवेळ त्याचे प्लास्टिक उखडून गेले तरी या घरांना अजिबात धक्का लागत नाही. दक्षिण आफ्रिका व युरोपमधून येणारे हे पक्षी अबॅबिल नावाने ओळखले जातात. असे हे पक्षी ९ महिन्यांच्या भारत भ्रमंतीवर येतात, असे अभ्यासक म्हणतात. सध्या तापी नदीच्या ब्रिटिशकालीन छोट्या पुलावर अशी अनेक घरटी दिसून येत आहेत. या पक्ष्यांनी येथे जणू वसाहतच केल्याचे येथे दिसून येते आहे. दरवर्षी सप्टेंबरमध्ये हे पक्षी येथे येतात आणि मार्चपर्यंत त्यांचे वास्तव्य असते. हे पक्षी एका तासात जवळपास ५० किलोमीटर्स वेगाने अंतर कापू शकतात. दिवसाकाठी ३०० ते ४०० किलोमीटर्सचे अंतर पार करण्याची या पक्ष्यांची क्षमता असते.



## असाही साबण वेडा

काही व्यक्तींना अफलातून छंद असतात आणि अशा छंदाने जवळपास ते झपाटलेलेच असतात. मुजफ्फरनगरमधील अशाच एका अवलियाला देशविदेशातील साबणांचा संग्रह करण्याचा छंद असून आतापर्यंत या व्यक्तीने विविध देशांमधील ११० साबणांचा संग्रह केला आहे. साबण्यांच्या खजिन्याचे एक अनोखे वैशिष्ट्य असे की, यात एका पैशापासून अगदी साडेआठ हजार रुपये किमतीचे साबणही समाविष्ट आहेत. जयकुमार असे या अवलियाचे नाव आहे. जयकुमार यांनी मागील तब्बल ४५ वर्षांपासून हा छंद जोपासला त्या काळी जय नावाचे एक साबण मिळायचे आणि आपल्या नावातही जय असल्याने आपल्याला हा छंद जडला, असे ते याविषयी बोलताना सांगतात. दुकानातून ते नेहमी दोन साबण घ्यायचे. यापैकी एक वापरायचे आणि एक संग्रही ठेवायचे. त्यानंतर त्यांनी विदेशातील साबणांचा संग्रहही सुरू केला. या छंदाच्या जोरावर त्यांची लिम्का बुक व आशिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये देखील नोंद झाली. जयकुमार यांचे मुजफ्फरनगरमध्ये टीव्ही, फ्रीजचे शोरुम आहे. ज्या-ज्या वेळी ते विदेश दौऱ्यावर जातात, त्या-त्या वेळी साबणही घेऊन येतात. खेळणी, दागिने, मेणबत्ती व विविध कलाकृतीच्या आकारातील सावणांचाही त्यांच्या संग्रहात आवर्जून समावेश राहिला आहे.





## सूत्र आहाराचे

शरीर निरोगी ठेवण्यासाठी रोजच्या आहारात जीवनसत्त्वे, खनिजे आणि फायबर यासारख्या गोष्टींचा समावेश असणे गरजेचे असते. शारीरिकदृष्ट्या निरोगी राहण्यासाठी सहसा प्रश्न पडतो की दिवसातून किती वेळा खावे. यासाठी कोणतेही निश्चित नियमित मानक नाही. उलट दिवसातून किती वेळा खावे हे वेगवेगळ्या व्यक्तींच्या शारीरिक स्थितीवर अवलंबून असते. मात्र, निरोगी व्यक्तीने सकाळ, दुपार व रात्री अशा तीन वेळा विभागून आहार घ्यावा, असे तज्ज्ञांचे मत आहे.

आता तीनवेळा आहार असावा, हे निरोगी लोकांसाठी. दुसरीकडे, सामान्य व्यक्तीच्या तुलनेत, ज्यांचे वजन सामान्यपेक्षा कमी आहे किंवा ज्यांना कोणत्याही शारीरिक समस्या आहेत त्यांनी दिवसातून चार वेळा टप्प्याटप्प्याने आहार घेणे अधिक रास्त मानले जाते. मधुमेहाच्या रुग्णांनी दिवसातून तीन वेळा जेवण केले पाहिजे. कारण ते दीर्घकाळ उपाशी राहिल्यास त्यांच्या समस्या वाढू शकतात. त्याचप्रमाणे, ज्या लोकांना लठ्ठपणाचा त्रास आहे किंवा ज्यांचे वजन सामान्यपेक्षा जास्त आहे त्यांना दिवसातून दोन-तीन वेळा हलके अन्न खाण्याचा सल्ला दिला जातो. सकाळच्या नाश्त्यामध्ये प्रथिने आणि जीवनसत्त्वांनी युक्त आहार, दुपारी कमी कॅलरीचा आहार आणि सायंकाळी सहज पचणाऱ्या घटकांचा समावेश असणे गरजेचे आहे, असे तज्ज्ञ म्हणतात.

## हिमालयावरुन उड्डाण का नाही?

परीक्षा पार पडल्यानंतर पर्यटनाचा ट्रेंड सुरु होईल आणि देशविदेशातील नवनवी ठिकाणे ट्रॅक करण्याची मालिकाही सुरू होईल. देशातही अनेक उत्तमोत्तम पर्यटन स्थळे आहेत आणि त्यात हिमालय देखील आहे. हिमालय ट्रेक करून जरूर पाहता येतो. पण, याचे ट्रेकिंगही इतके अजिबात सोपे नाही. यासाठी वेगळे प्रशिक्षण घ्यावे लागते आणि विविध संकटातून मार्ग काढावा लागतो. अशावेळी विमानातून हिमालय पाहता येईल, असाही विचार काहींच्या मनात चमकू शकतो. पण, असे करणेही शक्य नाही. कारण, हिमालय 'नो फ्लाय झोन 'मध्ये येतो.



याचे कारण असे की, हिमालयाचे हवामान नेहमीच सारखे नसते, ते सतत बदलत असते. बदलते हवामान कोणत्याही विमानासाठी धोकादायक असते. विमानातील हवेचा दाब प्रवाशांनुसार ठेवला जातो. पण, हिमालयाचे हवामान नेहमीच अनिश्चित असते, जे प्रवाशांसाठी धोकादायक ठरू शकते. त्यामुळे हिमालयावरून विमाने उडत नाहीत. हिमालयीन प्रदेशात नेव्हिगेशन सुविधा देखील उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत, कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत विमान एअर कंट्रोलशी संपर्क साधू शकणार नाही, कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत विमानाला जवळच्या विमानतळावर उत्तरावे लागते, परंतु हिमालयाजवळ कुठेही विमानतळ नाही. अशा परिस्थितीत हिमालयावर विमाने न उडवण्याचे हेही एक मोठे कारण आहे.

हिमालयाची उंची सुमारे २९ हजार फूट आहे आणि एखादे विमान सरासरी ३० ते ३५ हजार फूट उंचीवर उडते, अशा स्थितीत हिमालयावरून उड्डाण करणे धोकादायक ठरू शकते. विशेष म्हणजे आणीबाणीच्या वेळी विमानात २०-२५ मिनिटेच ऑक्सिजन असतो आणि आपत्कालीन परिस्थितीत विमान केवळ ८-१० हजार उंचीवर उड्डाण करतात जेणेकरून प्रवाशांना ऑक्सिजनची कोणतीही अडचण येऊ नये. यामुळेही हिमालयावरून उड्डाण करणे धोक्याचे ठरू शकते

# गृहभेटीच्या माध्यमातून जिल्ह्यात मतदानाचे प्रमाण वाढवूया, गृहभेटीच्या टीमसाठी नियमावली जाहीर

## जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ


मतदाराचा टक्का वाढविण्यासंदर्भात आयोजित बैठकीत सूचना देताना जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ.

नगर – लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये मतदानाची टक्केवारी वाढवण्याकरिता ५० टक्के पेक्षा कमी टक्के मतदान असलेल्या मतदान केंद्रांच्या क्षेत्रात घरोघरी भेटी देण्यात याव्यात. गृह भेटीसाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांसोबत आरोग्य सेवक, अंगणवाडी सेविका, महिला बचत गट, सहकारी संस्थांचे कर्मचारी वर्ग /प्रतिनिधी यांचा गट तयार करण्यात यावा. या प्रत्येक गटावर साधारणतः एका मतदान केंद्रातील मतदारांच्या जनजागृतीची जबाबदारी असेल. यातून मतदानाचे प्रमाण वाढवून आपण जिल्ह्यासाठी अभिमानास्पद काम करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले आहे.

मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांच्या कार्यालयाच्या वतीने राज्यामध्ये मतदानाचे प्रमाण वाढवण्यासाठी विविध प्रकारचे उपक्रम हाती घेण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर मतदान केंद्रस्तरावर मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांसह विविध क्षेत्रातील सुमारे ३ ते ४ कर्मचाऱ्यांची एक टीम तयार करावयाची असून त्या टीमला किमान तीनशे कुटुंबांच्या भेटीचे उद्दिष्ट देण्यात आलेले आहे.

श्री. सालीमठ यांच्या निर्देशानुसार या गृहभेटी ५०% पेक्षा कमी मतदान असणाऱ्या केंद्रांवर प्राधान्याने करण्यात याव्यात. त्यासाठी गृहभेटी द्यायला जाणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी मार्गदर्शक सूचना नियमावली, मतदार यादी आणि गृहभेटीचे क्षेत्र यावर आधारित प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार आहे. त्यामध्ये मतदारांच्या नकारात्मक उदासीन भूमिकेला सकारात्मक करण्यासाठी विशेष मार्गदर्शन केले जाणार आहे.

या नावीन्यपूर्ण उपक्रमामध्ये मतदारांच्या घरोघरी जाऊन त्यांना मतदान करण्यासाठी प्रोत्साहित करणे तसेच लोकशाही शासन व्यवस्था अबाधित राहण्यासाठी मत देणे किती महत्त्वाचे आहे, मतदान हे राष्ट्रीय कर्तव्य असून त्यामुळे देशाचा आणि ओघाने मतदारांचा कसा फायदा होणार आहे हे सांगून मतदारसंघांमध्ये उदासीनता दूर करण्याचा प्रयत्न या टीमला करायचा आहे.

मुख्य निवडणूक अधिकारी–महाराष्ट्र यांनी जारी केलेल्या नियमावली मध्ये गृहभेटी या उपक्रमासाठी टीम तयार करताना लक्षात घ्यावयाच्या बाबी, गृहभेटीत मतदारांपर्यंत कसे पोहोचावे व गृहभेटीत टाळावयाच्या बाबी तसेच मतदान दिनाला लक्षात घ्यावयाच्या बाबी आणि अहवालाचे सादरीकरण आदी विविध मुद्द्यांवर विस्तृत माहिती देण्यात आली असून संबंधित विभागांना ही नियमावली पाठवण्यात आली आहे.

तसेच गृहभेटीचा रोजच्या रोजचा अहवाल सुमारे ६ विशेष मुद्द्यांमध्ये सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांना सादर करावयाचा असून जिल्हा पातळीवरील गोषवारा मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात स्वीप कक्षाकडे सादर केला जाणार आहे. या बैठकीला विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.


भाजपा ओबीसी व भटक्या विमुक्त मेळाव्याच्या नियोजन बैठकप्रसंगी उपस्थित पदाधिकारी.

# भाजपा ओबीसी व भटक्या विमुक्त मोर्चाच्या मेळाव्याचे ६ मे रोजी नगरमध्ये आयोजन

नगर – नगर दक्षिण लोकसभेचे महायुतीचे उमेदवार डॉ.सुजय विखे पाटील यांच्या प्रचारार्थ नगर शहरात ओबीसी व भटक्या विमुक्त मोर्चाचा मेळावा ६ मे रोजी दातरंगे मळा येथील मार्कंडेय संकुल येथे होणार आहे. सर्व वेगवेगळ्या समाजातील सर्व जातीतील सर्व पक्षातील कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे, यासाठी नियोजन बैठक झाली आहे. मेळावा यशस्वी करण्यासाठी ओबीसी समाजाने उपस्थित राहावे, असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे ओबीसी प्रदेश उपाध्यक्ष किशोर डागवाले यांनी केले आहे.

रंगार गल्ली येथे महाले मंगल कार्यालय येथे होणाऱ्या मेळाव्याची नियोजन बैठक ओबीसी मोर्चाचे अध्यक्ष बाळासाहेब भुजबळ यांच्या अध्यक्षतेखाली झाली. याप्रसंगी ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष किशोर डागवाले, मनसेचे शहराध्यक्ष गजेंद्र राशिनकर, अनिता दिघे, सुधाकर आव्हाड, निशांत दातीर, बारा बलुतेदार महासंघाचे अध्यक्ष माऊली गायकवाड, अनिल इवळे, मच्छिंद्र बनकर, भटक्या विमुक्त आघाडीचे संदीप कुसळकर, सोनार समाजाचे गोपाल वर्मा, नाभिक समाजाचे अनिल निकम, परीट समाजाचे विनोद गायकवाड, जालिंदर बोरुडे, सुमित वर्मा, वकील आघाडीचे अध्यक्ष चंदन बारटक्के, शेषराव फुंदे, पद्मशाली समाजाचे सुमित इप्पलपेल्ली, गणेश कानगावकर, साळी समाजाचे सचिन पावले, सतीश रासने, दीपक देहेरेकर, धोबी समाजाचे राजेंद्र शिरसाठे, श्रीकांत फंड, दत्ता गाडळकर, ॲड.राहुल रासकर, माळी महासंघाचे गणेश बनकर, राजेंद्र एकाडे, शिवसेनेचे युवा आघाडीचे महेश लोंढे, शुभम काकडे, ओंकार लेंडकर, काशी कापडी समाजाचे सुनील भिंगारे, राजू वाडेकर, अधिवक्ता परिषदेचे सुनिल सूर्यवंशी आदी उपस्थित होते.


गोळीबार करून मारहाण करणाऱ्या आरोपींना अटक करुन मोक्का अंतर्गत कारवाई करावी, या मागणीचे निवेदन झेंडीगेट सोशल क्लबच्यावतीने देण्यात आले.

# कोठला येथे गोळीबार करून मारहाण करणाऱ्या आरोपींना अटक करुन मोक्का अंतर्गत कारवाई करावी

नगर – मंगलगेट परिसरातील कोठला येथे सरवर शेख यांच्यावर झालेल्या गोळीबार व हल्ला करणारे आरोपी यांच्याविरुद्ध ३०७ कलम व गोळीबार करून घातक शास्त्राचा वापर करून गुन्हा दाखल केलेला आहे. या प्रकरणात आरोपी हे सराईत गुन्हेगार असून त्यांच्याविरुद्ध अनेक गुन्हे दाखल आहे व परिसरात दहशत, दमदाटी, खंडणी, जिविताचे नुकसान, मालमत्तेचे नुकसान अशा प्रकारे गुन्हे व बेकायदेशीर कारवाया बाबतचे रेकॉर्ड शहरातील पोलीस स्टेशनमध्ये उपलब्ध आहे. आरोपी सराईत असून अद्यापही आरोपींना अटक करण्यात आलेली नाही, त्यामुळे आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी झेंडीगेट सोशल क्लबच्या वतीने पोलीस अधीक्षकांकडे निवेदन देऊन करण्यात आली आहे. यावेळी सोशल क्लबचे पदाधिकारी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, शहरामध्ये व परिसरात वातावरण अतिशय नाजूक असून लोकसभा निवडणुकीच्या धर्तीवर अनेक राजकीय तसेच सामाजिक नेते शहरांमध्ये येत आहे त्या परिस्थितीत पोलीस यंत्रणा ही केवळ त्या कार्यक्रमात व्यस्त असल्याचे भासवून गुंडांना व सराईत गुन्हेगारांना पाठीशी घालत आहे. आरोपी हे पुन्हा शहरांमध्ये प्राणघातक हल्ले करून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण करण्याची पुरेपूर शक्यता असल्याने त्यांच्याविरुद्ध तात्काळ कारवाई करून त्यांना अटक करण्यात यावी. आरोपी शहरांमध्ये खुलेआम बिनधास्तपणे फिरत असून त्यांचे मोबाईल चालू आहे. तसेच सोशल मीडियावर देखील ते कार्यरत आहे. यावरून कायद्याचा धाक त्यांना राहिलेला नाही हे दिसून येते. आरोपींची गुन्हेगारी पार्श्वभूमी बघता त्यांच्याविरुद्ध मोक्का कायद्यानुसार तात्काळ कारवाई करण्यात यावी अन्यथा शहरातील अनेक सामाजिक संघटनेतर्फे पोलीस अधीक्षक कार्यालयावर मोर्चे काढण्यात येणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे

# पंतप्रधान मोदींचा विकासाचा अश्वमेध कुणी रोखू शकणार नाही

## डॉ. सुजय विखे पाटील


शेवगांव तालुक्यातील घोटन येथे कार्यकर्ता संवाद मेळाव्यात बोलताना खा. सुजय विखे.

नगर – देशात पंतप्रधान मोदींचीच हवा असून त्यांच्या विकासाचा विश्वमेध कुणी रोखू शकणार नाही, असे प्रतिपादन महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले आहे. त्यांनी सांगितले की, कितीही विरोध केला तरी देशात केवळ नरेंद्र मोदी यांचेच वातावरण आहे आणि जनता त्यांच्याच बाजूने कौल देणार, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

७ मे रोजी नरेंद्र मोदी हे नगर जिल्ह्यात येणार आहे. त्यांच्या सभेची तयारी सुरू आहे. शेवगांव तालुक्यातील घोटन येथे कार्यकर्ता संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी आमदार चंद्रशेखर घुले याच्यासह, नरोडे काका, अंबादास कळमकर, संजय कोळगे, बबन भुसारी आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी डॉ. विखे यांनी सांगितले की, नरेंद्र मोदी यांनी मागील १० वर्षात देशाचा गतीमान विकास केला आहे. अनेक योजनांच्या मार्फत त्यांनी तळागळातील लोकांचा विकास करून दाखविला असून ३० कोटीहून अधिक लोकांना गरिबीतून मुक्त केले. आर्थिक धोरणांची प्रभावी अंमलबजावणी करून भारताची अर्थव्यवस्था पाचव्या स्थानावर आणली आहे. यामुळे देशा परदेशातून अनेक नामांकित कंपन्या भारतात गुंतवणुक करत आहेत. नरेंद्र मोदी यांनी आतंरराष्ट्रीय संबंध मजबूत केले. यामुळे आज जगात भारताचा डंका वाजत आहे. येणाऱ्या काळात विकसीत भारताचे स्वप्न त्यांनी देशाला दिले आहे. यामुळे मोदींच्या हमीवर देशातील नागरिकांचा विश्वास असल्याने तिसऱ्यांदा त्यांनाच पंतप्रधान पदावर बसविणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तुमचे प्रत्येक मत हे नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान करण्यासाठी आहे. यामुळे विचारपुर्वक मतदान करा, असे आवाहन त्यांनी केले.

चंद्रशेखर घुले यांनी सांगितले की, देशाला कणखर नेतृत्व देण्यासाठी नरेंद्र मोदी यांच्याशिवाय देशात कुठलाही पर्याय नाही. यामुळे महायुतीचा उमेदवाराला विजयी करणे आवश्यक आहे. सुजय विखे ह्यांनी मागील पाच वर्षात आपले कर्तव्य सिद्ध केले आहे. यामुळे नगरच्या विकासासाठी ते पंतप्रधान मोदींच्या टीममध्ये आवश्यक आहे. यामुळे १३ मे रोजी कमळाचे बटन दाबून त्यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करा असे आवाहन त्यांनी केले.

# निसर्गाला काही देणं आहे या भावनेतून प्रत्यक्ष काम केलं पाहिजे

## पोलीस उपनिरीक्षक अनिल अलवाल यांचे प्रतिपादन; शहरात मोकाट फिरणाऱ्या मुक्या जनावरांची तहान भागवण्यासाठी पाण्याच्या कुंडाची सोय

नगर – पर्यावरण संरक्षण म्हणजे आपल्या आजूबाजूच्या नैसर्गिक वातावरणाचे प्रदूषण, जंगलतोड, हवामान बदल यासारख्या धोक्यांपासून संरक्षण करणे, केवळ एवढेच नसून त्यासोबतच प्रजातींचे संरक्षण करण्यासाठी आणि संसाधनांचे टिकाऊ वापर सुनिश्चित करण्यासाठी नियम आणि कायदे तयार करणे आणि त्यांचे पालन करणे गरजेचे आहे. प्राण्यांसाठी पाणपोईची व्यवस्था करणे ही केवळ आजच्या गरजेची गोष्ट नसून भविष्यातील पिढ्यांसाठी एक टिकाऊ जग तयार करण्याची जबाबदारी आहे. त्यासाठी निसर्गाला काही देणं आहे या भावनेतून प्रत्यक्ष काम केलं पाहिजे, असे प्रतिपादन पोलीस उपनिरीक्षक अनिल अलवाल यांनी केले.

कडक उन्हाळ्यामुळे मुक्या जनावरांना पिण्यासाठी पाणी मिळत नाही, त्यामुळे पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्यावतीने शहरात मोकाट फिरणाऱ्या गायी आणि इतर मुक्या जनावरांना पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी म्हणून शहरातील काही भागात पाण्याचे कुंडी ठेवण्यात आले. या सामाजिक उपक्रमाचा शुभारंभ श्री मार्कंडेय मंदिर, गांधी मैदान येथे पोलीस उपनिरीक्षक अनिल अलवाल यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश लकशेट्टी, रोहित गुंडू, अमोल गाजेंगी, सौरभ कोंडा, कुमार आडेप, अमित सुंकी, संतोष गुंडू, इंजि.अक्षय बल्लाळ, शुभम सुंकी, श्रीनिवास बुरगुल, मयुर जिंदम आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना श्री. अलवाल म्हणाले की, समाजामध्ये निर्माण होणाऱ्या प्रश्नांचे जाण ठेवून पद्मशाली सोशल फाउंडेशन सामाजिक उपक्रम राबवत असते. आज गरजू व्यक्तीबरोबरच पशुपक्षी, प्राण्यांचे हे विचार करून जो सामाजिक उपक्रम राबवला तो खरोखरच कौतुकास्पद असल्याचे ते म्हणाले.


पद्मशाली सोशल फौंडेशनच्यावतीने मुक्या जनावरांना पिण्याच्या पाण्याच्या कुंड्याचे गांधी मैदान, श्री मार्कंडेय मंदिराजवळील उपक्रमाचा शुभारंभ करताना पोलिस उपनिरीक्षक अनिल अलवाल. समवेत अध्यक्ष गणेश लकशेट्टी, रोहित गुंडू, अमोल गाजेंगी, सौरभ कोंडा, कुमार आडेप आदी.

प्रास्ताविकात फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश लकशेट्टी म्हणाले की, वातावरणातील तापमानात वाढ होत आहे. या उष्णतेत जनावरांच्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. मुक्या, मोकाट जनावरांना मुबलक पाणी मिळत नाही. पाण्याविना जनावरे अशक्त होतात, त्यांचा जीव कासावीस होतो, अशा जनावरांची काळजी घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. या उद्देशानेच पद्मशाली सोशल फाउंडेशनच्यावतीने नगर शहरात विविध १० ठिकाणी पाण्याचे कुंडी ठेवून त्यामध्ये रोज पाणी ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे मुक्या जनावरांना मुबलक पाणी मिळेल, असे सांगून पांडुरंग कोंडा यांना उपचारासाठी पाच हजार रुपये व किराणा साहित्य तसेच सौ.उज्वला मामड्याल यांना खुब्याच्या ऑपरेशन साठी दहा हजार रुपये देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

हे पाण्याचे कुंडी श्री मार्कंडेय मंदिर, गांधी मैदान, तोफखाना, श्रमिक नगर, दातरंगे मळा, शिवाजीनगर, नवरंग व्यायाम शाळा, साईराम सोसायटी, गौरी घुमट या भागात ठेवण्यात आले आहेत. त्यामध्ये रोज ज्या ज्या ठिकाणी हे कुंड ठेवण्यात आलेले आहेत, तेथील श्री मार्कंडेय मंदिर देवस्थान, श्री एकदंत गणेश मंदिर, नवरंग व्यायाम शाळा, गौरीशंकर मित्र मंडळ, सूर्यमुखी गुरुदत्त युवा विकास प्रतिष्ठान, तोफखाना मित्र मंडळ, श्रमिक बालाजी मंदिर, दक्षिणमुखी हनुमान मित्र मंडळ, अष्टविनायक मित्र मंडळ या मंडळाचे कार्यकर्ते त्यामध्ये रोज स्वच्छ पाणी ठेवणार आहेत.

कार्यक्रमास फाउंडेशनचे वरद लकशेट्टी, प्रणव झावरे, दीपक मुदिगोंडा, श्रीनिवास कोडम, रोहन येनगंदुल, अमर सदुल, राहुल नराल, साईनाथ कोल्पेक, रोहित गुडा, शुभम कारमपुरी आदी कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इंजि. अक्षय बल्लाळ यांनी केले तर आभार मयुर जिंदम यांनी मानले.


संगमनेर येथील सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सभागृहात टीडीएफ माध्यमिक शिक्षक संघाच्या सहविचार सभेप्रसंगी उपस्थित शिक्षक.

# आप्पासाहेब शिंदे यांनी विधान परिषदेची निवडणूक लढवावी

नगर – अहमदनगर जिल्हा शिक्षक लोकशाही आघाडी (टीडीएफ) व माध्यमिक शिक्षक संघाची सहविचार सभा पार पडली. यामध्ये विधानपरिषद निवडणुकीमध्ये शिक्षकांचा हक्काचा आमदार करण्यासाठी सर्वांनी एकजुटीचा नारा दिला. तर टीडीएफच्या वतीने आप्पासाहेब शिंदे यांनी विधान परिषदेची निवडणूक लढविण्याचा सूर शिक्षकांमधून उमटला.

संगमनेर येथील सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सभागृहात ही सभा झाली. या सभेत नवीन कार्यकारिणीचा सत्कार करण्यात आला. फेडरेशनचे अध्यक्ष चांगदेव कडू यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेप्रसंगी टीडीएफ चे अध्यक्ष एम.एस. लगड, सचिव मुस्ताक सय्यद, माध्यमिक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष आप्पासाहेब शिंदे, सचिव राजेंद्र खेडकर, विठ्ठलराव पानसरे, उमेश गुंजाळ, राज गवांदे, प्रशांत होन, साहेबराव सकटे, अमोल ढानगे, देवीदास पालवे, दिपक पटेकर, संजय रोकडे, गोरख निर्मळ, दिलीप डोंगरे, गणेश कुऱ्हे, अर्जुन लंगोटे, बाळासाहेब राजळे, बाळकृष्ण चोपडे आदींसह जिल्ह्यातून आलेले शिक्षक प्रतिनिधी उपस्थित होते.

चांगदेव कडू यांनी संघटनेचा इतिहास व संघटनेची ध्येयधोरणे यावर प्रकाश टाकला व भविष्यात टीडीएफची वाटचाल कशी असेल? याची माहिती दिली. येत्या विधान परिषदेच्या निवडणुकीमध्ये जिल्ह्यातील सर्व शिक्षक–शिक्षिका आपला शिक्षक प्रतिनिधी विधान परिषदेत पाठविण्याचा निर्धार व्यक्त केला.

प्रमुख वक्त्यांनी शिक्षकांचे अनेक प्रश्न प्रलंबित असल्याची चर्चा केली. जुनी पेन्शन योजना, विनाअनुदानित शिक्षकांचे प्रश्न, शालार्थ आयडी, शालाबाह्य कामे यावर प्रामुख्याने सभेत चर्चा रंगली होती. शिक्षण विभागात प्रलंबित कामासंदर्भात व दप्तर दिरंगाईबाबत अनेक शिक्षकांनी भावना व्यक्त केल्या. त्या संदर्भात संघटना एकत्रित येऊन आंदोलन करण्याचा ठराव घेण्यात आला.

निवडणुका व जनगणना ही कामे राष्ट्रीय कर्तव्य असले, तरी या काळामध्ये निवडणुकीचे कामकाज करताना अनेक शिक्षकांना स्वतःच्या तालुक्यातून दुसऱ्या तालुक्यामध्ये आपले कर्तव्य बजावण्यासाठी जावे लागते. परंतु जाण्या–येण्याची सोय निवडणूक शाखेकडून करण्यात येत नाही. निवडणुकीचे काम संपल्यानंतर परत घरी येण्यासाठी उशीर होत असल्यामुळे सुविधा वाढवण्यासाठी व निवडणूक कर्मचाऱ्यांची गैरसोय होऊ नये, म्हणून प्रशासनाने ज्या ठिकाणी आपण काम करतो तेथेच नेमणूक करण्याची मागणी शिक्षकांनी केली. तसेच पन्नास वर्षा पुढील शिक्षकांना या कामातून सूट द्यावी व महिलांची गैरसोय होऊ नये या संदर्भात देखील संघटनेच्या माध्यमातून पाठपुरावा करण्याचे स्पष्ट करण्यात आले.

या सभेत शिक्षक लोकशाही आघाडी (टीडीएफ) कार्यकर्ता शिबीर घेण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. माध्यमिक शिक्षक संघ व टीडीएफ यांनी एकत्रितपणे काम करण्याचे व येणाऱ्या विधानपरिषद निवडणुकीमध्ये शिक्षकांचा हक्काचा आमदार करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने वाटचाल करण्याचा संकल्प केला.

# जाहीर निवेदन

खालील नमुद कर्जदार/जामीनदार पंडीत दीनदयाळ नागरी सहकारी पतसंस्था मर्या. आनंदीबाजार, अहमदनगर यांना या निवेदनाव्दारे कळविण्यांत येते की, मा.जिल्हा उपनिबंधक , सहकारी संस्था, अहमदनगर यांच्याकडील आदेश जा क्र.वि–१४/पंडीतदीनदयाळ पत /ताबा/प्राधिकृत/सन २०२४ दि.११/०३/२०२४ अन्वये खालील नमूद दिवशी खालील मिळकत पंडीत दीनदयाळ नागरी सहकारी पतसंस्था मर्या. आनंदीबाजार, अहमदनगर यांच्या ताब्यात देणेबाबत मला प्राधिकृत केलेले आहे.

| अ. क्र. | स्थावर मालमत्ता हस्तांतरित झालेल्या कर्जदाराचे /जामिनदाराचे नांव | ताबा दयावयाची मिळकत वर्णन | ताबा दयावयाचा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| १ | श्री.दत्तात्रय हरिभाऊ कावरे<br>सौ.सविता दत्तात्रय कावरे<br>रा.खिस्त गल्ली,माळीवाडा, अ.नगर | मौजे अहमदनगर येथील सि.सनं. ४२७८(तिसरा मजला) सदनिका नं.३०१ क्षेत्र ४७.५१ चौ.मि. | १५/०५/२०२४<br>स.१०–०० वा. |
| २ | श्री.किशोर नरहरी पाथरकर<br>रा.साईगंगा अपार्टमेंट, डॉक्टर कॉलनी मागे,सारसनगर , अ.नगर | मौजे केडगांव ता.जि.अहमदनगर येथील सि.स.नं. ५२/१ प्लॉट न.७ क्षेत्र २१०.०० चौ.मि. | १५/०५/२०२४<br>दु.१२–०० वा. |
| ३ | श्री.रोहिदास गजाराम सातपुते<br>रा.प्राजक्ता बंगला, गुलमोहर रोड.<br>सावेडी, अहमदनगर | मौजे सावेडी, ता.जि.अ.नगर येथील सि.स.नं. ९४ ब्लॉक नं. डी प्लॉट नं ४ पै (१३) क्षेत्र ४.७२ चौ.मी. | १६/०५/२०२४<br>स.१०–०० वा. |

उपरोक्त नमुद मिळकत पंडीत दीनदयाळ नागरी सहकारी पतसंस्था मर्या, आनंदीबाजार, अहमदनगर यांना उपरोक्त दिवशी ताब्यात देण्यांत येणार आहे तरी आपण सदर मिळकत मधील असलेल्या सर्व साहित्य व इतर वस्तू इतरत्र घेवुन जावे व संपुर्ण मिळकत मोकळी करावे. उपरोक्त नमुद ताब्याच्या दिवशी ज्या स्थितीमध्ये मिळकत त्या स्थितीत मध्ये मिळकतचा ताबा पंडीत दीनदयाळ नागरी सहकारी पतसंस्था मर्या. आनंदीबाजार, अहमदनगर यांना देण्यांत येईल याची नोंद घ्यावी.

(शुभांगी गोंड)
प्राधिकृत अधिकारी
तथा उपनिबंधक सहकारी संस्था
नगर तालुका, अहमदनगर

स्थळ : अहमदनगर
दि.३०/४/२०२४

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

